# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०२ ऑगस्ट, २०१७ / श्रावण ११, १९३९ ( शके )**

**(१) वित्त व नियोजन, वने मंत्री**
**(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री**
**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री**
**(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६६**

---

**नांदेड जिल्हयात डेंग्यू व हिवतापाच्या रुग्णांमध्ये झालेली वाढ**

**(१) * ८७४६० श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात गत तीन वर्षात डेंग्यूचे ३९३ रुग्ण आढळले असून माहे जानेवारी ते मार्च, २०१७ या कालावधीत डेंग्यूचे २२ तर हिवतापाचे ४ रुग्ण आढळून आल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळयात या साथींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असल्याने डेंग्यू व हिवताप आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, बिलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

नांदेड जिल्ह्यात मागील तीन वर्षात डेंग्यूचे एकूण ३७२ रुग्ण आढळले असून, माहे जानेवारी, २०१७ ते मार्च, २०१७ या कालावधीत डेंग्यूचे २२ तर हिवतापाचे ४ रुग्ण आढळून आले आहेत.

(२) नांदेड जिल्ह्यात डेंग्यू व हिवताप आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी खालील उपाययोजना नियमितपणे राबविल्या जात आहेत :-

• आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत नियमित ताप सर्वेक्षण.

• उद्रेकाच्या ठिकाणी जलद ताप रुग्ण सर्वेक्षण.

• साथरोग उद्रेकाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी जिल्हा/तालुका पातळीवर शीघ्र प्रतिसाद पथक कार्यरत आहेत.

• ताप रुग्णांचे रक्तजल नमूने घेऊन सेन्टीनल हॉस्पिटल येथील प्रयोगशाळेत मोफत तपासणी.

• कायम स्वरुपी डासोत्पत्ती स्थानांमध्ये डासअळी भक्षक गप्पीमासे सोडणे.

• डेंगी रुग्णांना लक्षणाधारीत उपचार.

• हिवताप दुषित रुग्णांना जंतुच्या प्रकारानुसार समूळ उपचार.

• हिवताप नियंत्रणासाठी हिवतापाचा प्रादुर्भाव असलेल्या निवडक गावांमध्ये मच्छरदाण्यांचे वाटप.

• डास नियंत्रणाकरिता ए.पी.आय. २ पेक्षा जास्त असलेल्या भागात पारेषण काळात घरोघर किटकनाशक फवारणीच्या दोन फेऱ्या घेण्यात येतात.

• सर्व आरोग्य संस्थांना औषधे व इतर साधन सामुग्रीचा पुरेसा पुरवठा.

• राष्ट्रीय डेंग्यु दिन, डेंग्यु प्रतिरोध महिना व शालेय डेंग्यू जागृती मोहिम तसेच जागतिक हिवताप दिन व हिवताप प्रतिरोध महिना याद्वारे जनतेमध्ये जनजागृती.

• विविध माध्यमांद्वारे जनतेस आरोग्य शिक्षण.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून 'ग्रामपंचायत जनसुविधा' योजनेंतर्गत ग्रामपंचायतींना देण्यात येत असलेल्या अनुदानात वाढ करण्याबाबत

**(२) * ८५००३ श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून माहे ऑगस्ट, २०१६ पासून जिल्हयातील ३००० ते ५००० लोकवस्ती असलेल्या १३५ ग्रामपंचायतींना 'ग्रामपंचायत जनसुविधा' योजनेंतर्गत दफनभूमी, दफन भूमी रस्ता, चबुतऱ्याचे बांधकाम, भूसंपादन व संरक्षण भिंत बांधण्यासाठी देण्यात येणाऱ्या १० लाख रुपयांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत ग्रामविकास विभागाकडे सातत्याने मागणी करण्यात आलेली असतानाही अद्याप अनुदानात वाढ झाली नसल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून १० लाख रुपयांचे अनुदान ऐवजी २५ लाख रुपये इतके अनुदान देण्याचा ठराव सादर केला असून याचा लाभ जिल्हयातील डोंगराळ भागात असणाऱ्या १२५ ग्रामपंचायतींना होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायत जनसुविधा योजनेच्या अनुदानात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय

(२) होय

(३) ग्रामपंचायतींना जनसुविधासाठी विशेष अनुदान या योजनेंतर्गत ग्रामपंचायत इमारतीची बांधकामे व स्मशानभुमीच्या विकास कामांसाठी रु.१० लाखाची आर्थिक मर्यादा रु.२०.०० लक्ष इतकी वाढवून देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चाकण (ता.खेड, जि.पुणे) औद्योगिक वसाहत येथे राज्य कामगार विमा महामंडळाचे रुग्णालय उभारण्याबाबत**

**(३) * ९१११३८ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य कामगार विमा महामंडळाच्या (ईएसआयसी) माध्यमातून राज्यात १० नवीन रुग्णालये उभारणीसाठी केंद्राने राज्य शासनाला मान्यता देवून १००० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन मा.केंद्रीय कामगार राज्यमंत्री यांनी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चाकण (ता.खेड, जि.पुणे) औद्योगिक वसाहत येथे या निधीमधून १५० खाटांचे रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनास पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चाकण औद्योगिक वसाहत येथे रुग्णालय उभारणीच्या प्रस्तावास केंद्र शासनाकडून मंजुरी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासनाने दि.०९ मे, २०१६ अन्वये राज्य कामगार विमा महामंडळास निर्गमित केलेल्या "ना हरकत प्रमाणपत्र" च्या अनुषंगाने केंद्र शासनाने दि.०१.०८.२०१६ पासून सदर २० जिल्हयातील उर्वरीत संपूर्ण क्षेत्रास राज्य कामगार विमा योजना लागु केली आहे. सदर नवीन क्षेत्रातील विमाधारकांना वैद्यकीय सेवा पुरविण्याकरीता राज्यात एकूण नवीन १० राज्य कामगार विमा रुग्णालये सुरु करण्याबाबत राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांनी प्रस्तावित केले असून, सदर नवीन १० रुग्णालयांचे बांधकाम व त्यावरील होणारा संपूर्ण खर्च हा राज्य कामगार विमा महामंडळामार्फत करण्यात येणार आहे.

(२) हे अशंत: खरे आहे.

क्षेत्रीय संचालक, राज्य कामगार विमा महामंडळ, मुंबई मार्फत सदर १० नवीन राज्य कामगार विमा रुग्णालये उभारणीकरीता संमती व जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असून सदर प्रस्तावित १० रुग्णालयांमध्ये चाकण औद्योगिक वसाहत (ता.खेड, जि.पुणे) येथे १५० खाटांचे रुग्णालय उभारण्याबाबतचा समावेश आहे.

(३) केंद्र शासनाने सदर १० नवीन रुग्णालये सुरु करावयाचे प्रस्तावित केले आहे. याबाबत केंद्रशासनाला राज्य शासनाकडून पुर्ण सहकार्य केले जात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील लघुसिंचन प्रकल्पाच्या कामांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) * ८९५११ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील ० हेक्टर ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या सुमारे ३५ लघुसिंचन प्रकल्पांना प्रशासकीय मंजुरी मिळाली असून त्यापैकी राजापूर कार्यक्षेत्रातील ९ प्रकल्प निधीअभावी रद्द केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रद्द केलेल्या ९ प्रकल्पांना निधी उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली व या प्रकल्पांना किती कालावधीत निधी उपलब्ध होणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१०-११ ते आजपर्यंत महामंडळा मार्फत रत्नागिरी जिल्हयात ० हेक्टर ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या २६ लघुसिंचन योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या २६ लघु सिंचन योजनापैकी ११ लघु सिंचन योजना राजापूर विधानसभा कार्यक्षेत्रातील आहेत.

या ११ लघु सिंचन योजनापैकी ७ योजनांची प्रशासकीय मान्यता पाणी उपलब्धता प्रमाणपत्रा अभावी रद्द करण्यात आली व उर्वरीत ४ योजनांची प्रशासकीय मान्यता महामंडळाकडील अतिरिक्त दायित्व निर्माण झाल्यामुळे रद्द करण्यात आली.

(२) प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आली असल्यामुळे निधी मागणी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पठावे (ता.बागलाण, जि.नाशिक) लघुपाटबंधारे कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(५) * ८७११२ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पठावे (ता.बागलाण, जि.नाशिक) लघुपाटबंधारे कालवा दुरुस्तीसाठी राज्य शासनाने दिनांक १२ सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास ५६.४३ लक्ष रुपयांची प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन वर्षाचा कालावधी होऊनही कालव्याच्या कामास सुरुवात न झाल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.वित्तमंत्री व मा.जलसंपदा मंत्री यांच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे निदर्शनास आणले असतानाही याबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पठावे लघुपाटबंधारे कालवा दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) व (३) मा.लोकप्रतिनिधींचे पत्र शासनास प्राप्त झालेले असून त्यातील विनंतीच्या अनुषंगाने पठावे ल.पा.प्रकल्प कालव्याच्या अंदाजपत्रकास रु.५६.४३ लक्षची प्रथम तांत्रिक मंजूरी दि.१२.३.२०१५ रोजी देण्यात आली होती. परंतु काम सुरु न झाल्यामुळे व दरसूचीत बदल झाल्या कारणाने सदर

अंदाजपत्रकास सन २०१६-१७ या वर्षात रु.५५.६२ रकमेच्या अंदाजपत्रकास सुधारीत तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली. त्यानंतर सदर कामाची निविदा काढून दि.१७.१०.२०१६ रोजी संबंधीत ठेकेदारास कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. कामाची सुरुवात झालेली असून काम प्रगती पथावर आहे. माहे डिसेंबर, २०१७ अखेर पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील घोड धरणातून बेकायदेशीरपणे पाणी उपसा होत असल्याबाबत**

**(६) * ८७७८२ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील घोड धरणातून पाणी उपसा करण्यास बंदी असतानाही पाणी उपसा होत असल्याचे व पाटबंधारे अधिकाऱ्यांनी घोडच्या १७ क्रमांकाच्या वितरिकेतून पाणी सोडण्यासाठी कालवा फोडल्याने रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार घोड धरणातून पाणी उपसा करण्यास बंदी असतानाही पाणी उपसा करणाऱ्यांवर व सदर वितरिकेतून पाणी सोडण्यासाठी कालवा फोडणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) नाही.

कालवा सल्लागार समितीच्या दि. ३०/११/२०१६ रोजीच्या बैठकीत घोड प्रकल्पाच्या उन्हाळी हंगामातील सिंचनाच्या १.००४ अ.घ.फु. पाणी वापरास मंजुरी देण्यात आली असून त्यानुसार उन्हाळी हंगामात जलाशयावरील व कालव्यावरील सिंचनासाठी पाणी पुरवठा करण्यात आला. सदर आवर्तनाचे

दरम्यान (दि. २९.३.२०१७ ते २.५.२०१७) घोड डाव्या कालव्याची वितरीका क्र. १७ चे गेट नादुरूस्त असल्यामुळे व त्याची फळी तुटलेली असल्यामुळे मुख्य विमोचकाचे (Head Regulator) पाईप मध्ये मोठे दगड गोटे अडकले होते. त्यामुळे सदर वितरिकेतून पाणी पुरवठा करणे शक्य नव्हते. त्या करीता पाईप मध्ये अडकलेले दगडगोटे काढण्याकरीता वितरिका क्र.१७ च्या विमोचकावरील सेवा पथाकडील भराव यांत्रिकी विभागाच्या मशीनरी व्दारे खोदुन पाईप मधील दगड गोटे काढून चारीवरील सिंचना करीता पाणी पुरवठा करण्यात आला. त्यानंतर सदर भराव पूर्ववत करण्यात आला आहे. सदर भराव खोदल्यामुळे सेवापथाचे नुकसान झालेले नाही, किंवा कोणत्याही सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झालेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्हयातील पाणलोट कार्यक्रमांतर्गत बंधाऱ्यांची कामे ठेकेदारांनी निर्धारीत वेळेत पूर्ण न केल्याबाबत

**(७) * ९०६९०   श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयात पाणलोट कार्यक्रमांतर्गत तालुका कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली बांधण्यात येणाऱ्या ११ बंधाऱ्यांची कामे ठेकेदार आणि कृषी विभागाच्या दुर्लक्षपणामुळे प्रलंबित असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधाऱ्यांची कामे वेळेत पूर्ण न झाल्याने पाणलोट कार्यक्रमांतर्गतचा निधी शासनाकडे परत जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन बंधाऱ्यांच्या कामांना मुदतवाढ देण्याबाबत व निर्धारित वेळेत सदर कामे पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे. बॅच-१ चा कालावधी समाप्त झाल्याने निधीचा विनीयोग पुढील बॅचसाठी करण्यात येत आहे.

(३) दायीत्व शिल्लक असलेल्या कामांची अदायगी करण्यास शासनाने परवानगी दिली असून निर्धारीत वेळेत कामे न करणाऱ्या संबंधित ठेकेदारांकडून त्यांची अनामत रक्कम, सुरक्षा व अतिरिक्त सुरक्षा ठेव जप्त करुन त्यांच्या नावाचा काळया यादीत समावेश का करण्यात येऊ नये याबाबत खुलासा मागविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत निवडण्यात आलेल्या गावांतील मंजूर कामे करण्यास होत असलेला विलंब**

**(८) * ८८८३९ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या ३२ गावांतील मंजूर कामे करण्यास कृषी अधिकाऱ्यांकडून विलंब केला जात असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, याबाबातची चौकशी करुन सदर गावातील जलयुक्त शिवार योजनेची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

कृषि विभागामार्फत सिल्लोड तालुक्यात एकूण १०२६ कामे प्रस्तावित केली असुन त्यापैकी ८१३ कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सदर कामांपैकी जून, २०१७ अखेर ७५९ कामे पूर्ण करण्यात आली

असुन १५ कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित कामे सुरु करुन पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे सफाळे (ता.जि.पालघर) येथील वन विभागाच्या जमिनीतून मुरुम व मातीचे अवैधरित्या होत असलेले उत्खनन

**(९) * ९१५१७ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सफाळे (ता.जि.पालघर) येथील वन विभागाच्या जमिनीतून अवैधरित्या मुरुम व मातीचे उत्खनन होत असून शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अवैध उत्खननामुळे तेथे अस्तित्वात असलेल्या नैसर्गिक नाला आणि पर्यावरणाचा ऱ्हास होत असतांना वन अधिकारी याकडे दुर्लक्ष करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, तद्‌नुसार अवैध उत्खनन करणाऱ्यांवर व याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मौजे सफाळे, ता.जि.पालघर हद्दीतील वन विभागाच्या जमिनीमधून गौण खनिज अवैध उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करावी, याबाबतची तक्रार माहे जून, २०१७ मध्ये प्राप्त झाली आहे.
(२), (३), (४) व (५) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, प्रश्नांकित क्षेत्र हे संरक्षित वन असून सन १९६० मध्ये महसूल विभागास हस्तांतरित करण्यात आले आहे.

तहसिलदार, पालघर यांनी मौजे उंबरपाडा सफाळे ग्रामपंचायत हद्दी मधील मोरावणे बंधाऱ्यातील गाळ काढण्यास सदरचा गाळ शेत जमिनीत टाकण्याच्या अटीवर दिनांक १०.२.२०१७ अन्वये परवानगी दिली होती. परंतु ग्रामपंचायत उंबरपाडा, सफाळे यांनी ११० ब्रास गाळ मिश्रीत मातीची अनधिकृत वाहतूक करुन इतर ठिकाणी टाकली आहे. त्याबाबत तहसिलदार, पालघर यांनी ग्रामपंचायत उंबरपाडा यांना रु. २,६४,०००/- दंडनीय रकमेची नोटीस पारीत केली आहे. त्यामुळे अवैध उत्खनन करणाऱ्यांवर जाणीवपुर्वक दुर्लक्ष करण्यात आलेले नाही.

-----------------

**बावधन (ता.हवेली, जि.पुणे) येथील वनक्षेत्रात वृक्षतोड करून अतिक्रमण केल्याबाबत**

**(१०) * ९२०२६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बावधन (ता.हवेली, जि.पुणे) येथील स्टारगेज या बांधकाम प्रकल्प व्यावसायिकाने प्रकल्पात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड व वनसंपदा नष्ट करुन वनक्षेत्रात अतिक्रमण केल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या अवैध वृक्षतोडीकडे संबंधित प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त प्रकरणातील संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) बावधन (ता.हवेली, जि.पुणे) येथील स्टारगेज या बांधकाम प्रकल्प व्यावसायिकाने प्रकल्पात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड व वनसंपदा नष्ट करुन वनक्षेत्रात अतिक्रमण केल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## चंदगड व आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यात हत्ती आणि गवा रेड्यांनी शेती पिकांसह शेतकऱ्यांच्या सामुग्रीचे केलेले नुकसान

**(११) * ८७४९६ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड व आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यात हत्ती आणि गवा रेडयांनी मोठया प्रमाणात शेती पिकांसह शेतकऱ्यांच्या सामुग्रीचे मोठया प्रमाणात नुकसान केल्याचे माहे मार्च, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, तद्‌नुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत, तसेच हत्ती व गवा रेडयांचा बंदोबस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) कोल्हापूर वनवृत्तातील आजरा, चंदगड व पाटणे वनपरिक्षेत्रात गवा व हत्ती या वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्याच्या अनुक्रमे २८४ व २२ प्रकरणे निदर्शनास आली आहेत.

तसेच चंदगड तालुक्यातील पाटणे वनपरिक्षेत्रातील मौजे कलिवडे येथे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये व पोर्ले येथे माहे फेब्रुवारी, २०१७ चे कालावधीत वन्यहतींनी बैलगाडी मोडतोड केल्याच्या ३ तर ट्रॅक्टर टायर फोडण्याची १ घटना निदर्शनास आली आहे.

(२) वन्यप्राण्यांनी नुकसान केलेल्या घटनांची विभागामार्फत पहाणी करण्यात आली आहे.

(३) प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केलेल्या प्रकरण्यात संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास अर्थसहाय्य रु.१६.३६ लाख अदा करण्यात आले आहे.

वन्यप्राण्यांद्वारे नुकसान होऊ नये व मानव वन्यहत्ती संघर्ष कमी व्हावा यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींकडून सर्वांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात येते.

• गावकऱ्यांच्या मदतीने टॉर्च, फटाके, अग्नाबाण इ. चा वापर करुन व हाकारा गट तयार करुन हत्तींना शेती व मानवी वस्तीपासून दूर नेण्यात येते.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी उपाययोजना केल्या जातात.

• काही क्षेत्रात वनहद्दींवर वन्यप्राणी प्रतिबंधक चर खोदण्यात आले आहेत, तसेच सौर कुंपण तयार घालण्यात आले आहे.

• Rescue Team तयार करण्यात आली आहे.

• मानव वन्यप्राणी संघर्ष रोखण्याच्या दृष्टीने वनअधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येते.

• वनांवरील अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने सबसिडीवर एलपीजी गॅस शेगडी व सिलेंडर पुरवठा केला जात आहे.

• परिक्षेत्र स्तरावर क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत नियमित गस्त करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अडवली-भुतावली, नवी मुंबई (जि.ठाणे) येथील शेतकऱ्यांच्या जमिनींवर खासगी विकासकांकडून डेब्रिज टाकण्यात येत असल्याबाबत

**(१२) * ९२६५६ श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अडवली-भुतावली, नवी मुंबई (जि.ठाणे) येथील ३५५ हेक्टरवरील जंगल नष्ट करुन टाऊनशीप उभारली जाणार असून तेथील शेतक-यांनी त्यांची जमिन विकण्यास विरोध केल्याने माफियांच्या सहकार्याने शेतकऱ्यांच्या जमिनीवर चारही बाजूला डेब्रिज भराव करण्याचे काम खासगी विकासकाने सुरु केल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वनजमिनीवर डेब्रिज टाकून वृक्षतोड करणाऱ्यांविरुध्द शेतक-यांनी दोन वर्षे महानगरपालिकेकडे तक्रारी करुनही महापालिका प्रशासन डेब्रिज माफियांवर कारवाई करत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या प्रकरणातील दोषी असलेले खासगी विकासक, डेब्रिज माफिया व महापालिकेचे संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मौजे अडवली भुतावली, ता.जि.ठाणे येथे राखीव वन, सर्वे क्रमांक ९४ अ मधील ३३९.४२१ हेक्टर व संरक्षित वन, सर्वे क्र.९४/ब मधील २.३२७ हेक्टर असे एकूण ३४१.७४८ हेक्टर क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात आहे. वन विभागाच्या ताब्यातील उक्त क्षेत्रामध्ये जंगल नष्ट करुन भराव झालेला नाही.

मौजे अडवली भुतावली येथील वन विभागाच्या वरील क्षेत्राभोवती संरक्षक भिंतीचे बांधकाम करण्यात आले आहे. सदर वनक्षेत्रालगत सर्वे क्रमांक ३, ४, ५ व ६ या खाजगी क्षेत्रामध्ये तसेच महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम, १९७५ चे कलम २२ अन्वये चौकशी होऊन दिनांक २५.१०.१९८० पुर्वी खातेदारांस पुन:स्थापित झालेल्या सर्वे क्रमांक ७८ व ७९ च्या क्षेत्रामध्ये भराव झाल्याचे निदर्शनास येते.

(२) व (३) नगर विकास विभागाने सादर केलेल्या माहितीअन्वये खाजगी विकासकांच्या मालकीच्या जमिनीवर टाकण्यात आलेल्या डेब्रिजमुळे शेत जमिनीचे नुकसान होत असल्याबाबतच्या व येण्याजाण्यास अडथळा निर्माण होत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर तक्रारीच्या अनुषंगाने

दि.१५.४.२०१७ पासून अडवली भुतावली परिसरात डेब्रिज टाकणेस नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडून मनाई करण्यात आलेली आहे. तसेच याबाबत तहसिलदार ठाणे यांना त्यांचेकडून दि.१७.४.२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर जागेची स्थळ पाहणी करुन, खाजगी मालकीच्या, वनक्षेत्रातील व इतर जमिनीचा गट क्रमांकनिहाय माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

**पाली व महड (जि.रायगड) येथील अष्टविनायक तीर्थक्षेत्रातील विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(१३) * ९१८५७ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अष्टविनायक मंदिर व मंदिरांचा परिसर विकसीत व सुशोभिकरण करण्यासाठी प्रत्येक वर्षी १२५ लाखांचा निधी ५ वर्षांकरीता शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येणार होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हयातील पाली व महड येथील अष्टविनायक स्थळांच्या ठिकाणी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सन २०११ मध्ये १२५ लाख इतका निधी वितरीत करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्हयातील पाली व महड येथील अष्टविनायक स्थळांचा विकास करण्यासाठी फक्त एकच टप्पा निधी देण्यात आलेला असून सन २०१२ पासून १२५ लाख प्रति वर्षी प्रमाणे निधी देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पाली व महड येथील अष्टविनायक स्थळांचा विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) नाही.

(२) होय.पाली व महड येथील अष्टविनायकांच्या स्थळी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येकी रू.१२५.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला होता.

(३) प्रत्येक वर्षी रू.१२५.०० लक्ष एवढा निधी पाच वर्षाकरिता देण्यात येणार नव्हता.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बारामती (जि.पुणे) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त पदांबाबत**

**(१४) * ९२२७२ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारामती (जि.पुणे) तालुक्यातील सिल्व्हर ज्युबली रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देऊन त्यासाठी अद्यावत इमारत बांधून रुग्णालय सुरु करण्यात आले असून या उपजिल्हा रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांसह इ.सी.जी, सोनोग्राफी, अस्तीरोग बधीरीकरण तज्ज्ञ अशी एकूण २९ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात १३ वैद्यकिय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यापैकी फक्त ३ वैद्यकिय अधिकारी सध्या कार्यरत असल्याने गरजू रुग्णांना वैद्यकिय सेवा उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय बारामती जि.पुणे येथे  गट-अ ते गट-ड संवर्गाची एकुण ७४ पदे मंजूर असून त्यापैकी ५० पदे भरलेली व २४ पदे रिक्त आहेत.

त्यापैकी, वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची एकुण १३ पदे मंजूर असून ९ पदे भरलेली आहेत. भरलेल्या पदांमध्ये बालरोगतज्ञ, अस्थिव्यंगतज्ञ व नेत्रशल्यचिकित्सक कार्यरत आहेत. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आयपीएचएस खाली भूलतज्ञ, स्रीरोगतज्ञ, फिजीशियन, दंतशल्यचिकित्सक यांच्या सेवा उपलब्ध करुन दिल्या आहेत. तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाअंतर्गत ८ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. तसेच ई.सी.जी. व सोनोग्राफीची सुविधा उपलब्ध आहे.

उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत रुग्णांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(३) वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे. रु.५४००) संवर्गाची रिक्त पदे संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत Walk in interview च्या माध्यमातून भरण्याबाबतची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे.तसेच गट-क व गट-ड संवर्गाची पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे साखरी-म्हांळुगे (ता.गगनबावडा, जि.कोल्हापूर) येथील बंधाऱ्यांचे निकृष्ट दर्जाचे काम केल्याबाबत

**(१५) * ८६१८७ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे साखरी-म्हांळुगे (ता.गगनबावडा, जि.कोल्हापूर) येथील बंधाऱ्यांचे निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे जलयुक्त शिवार योजनेचे कोटयवधी रुपयांचा निधी वाया गेल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी समिती गठीत करून चौकशी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार उपविभागीय कृषी अधिकारी, गडहिंग्लज यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने यादृच्छिक (Random) पद्धतीने माती नाला बांध कामांची तपासणी करून अहवाल सादर केला आहे त्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्या आहेत.

तपासलेली कामे जून महिन्यात तीन वेळा अतिवृष्टी होऊनही सुस्थितीत आहेत व पाण्याने भरलेली आहेत. पूर्ण झालेल्या कामांची कृषि महाविद्यालय, कोल्हापूर यांचेमार्फत त्रयस्थ यंत्रणा म्हणून तपासणी करण्यात आली असून कामांचा दर्जा चांगला असल्याचे आढळून आले आहे.

(३) माती नाला बांध कामात आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने चौकशी समितीने त्रुटींची पुर्तता करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## करवीर (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ३५ शाळांची झालेली दुरवस्था

**(१६) * ९०१९७ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करवीर (जि.कोल्हापूर) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ३५ शाळांची दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव पंचायत समिती, करवीर यांच्याकडून जिल्हा

परिषद, कोल्हापूर यांच्याकडे मंजूरीसाठी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांची दुरुस्ती करण्याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने यावर्षीच्या पावसाळ्यात प्राथमिक शाळांच्या विद्यार्थ्यांची गैरसोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावानुसार शाळा तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे. १५ शाळा दुरुस्तीचे प्रस्ताव दिनांक २ फेब्रुवारी, २०१७ रोजी प्राप्त झाले आहे.

(२) व (३) उपरोक्त शाळा दुरुस्तीसाठी अंदाजे रु. ३०.८० लक्ष इतक्या निधीची आवश्यकता असून जिल्हा नियोजन समितीकडे निधीची मागणी केलेली आहे. सन २०१७-२०१८ मध्ये जिल्हा नियोजन समितीने शाळा दुरुस्तीसाठी व बांधकामासाठी रु. २५० लक्ष इतका नियतव्यय मंजूर केलेला आहे. सद्यस्थितीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळामध्ये दलदलिचा व पावसाचा त्रास असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अभिमत विद्यापीठे आणि खासगी महाविद्यालयामधील पदव्युत्तर वैद्यकिय अभ्यासक्रमांच्या ६७.५ टक्के राखीव कोट्याबाबत

**(१७) * ८६१०९ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमांमध्ये देशातील अनेक राज्याने त्या राज्यातील मुलांसाठी ५० टक्क्यांपासून ते १०० टक्क्यांपर्यत राखीव कोटा ठेवला असून त्यानुसार राज्यातील स्थानिक विद्यार्थ्यांना वैद्यकीय

अभ्यासक्रमात जास्त जागा उपलब्ध व्हाव्यात यासाठी दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास राज्य शासनाने अध्यादेश काढून पदव्युत्तर वैद्यकिय आणि डेंटल अभ्यासक्रमासाठी ६७.५ टक्के कोटा राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या या निर्णयाच्या विरोधात पंजाब आणि राज्यस्थान मधील विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने मा.मुंबई उच्च न्यायालयाने या निर्णयाला स्थगिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयात राज्य शासनाची बाजू स्पष्ट करुन स्थानिक विद्यार्थ्यांना पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमांमध्ये राखीव कोटा ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे. राज्यातील अधिवासी विद्यार्थ्यांना पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमात प्रवेशाच्या जास्त जागा उपलब्ध होण्यासाठी शासन निर्णय दिनांक २७/०४/२०१७ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले होते.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मा.उच्च न्यायालयाने शासन निर्णयास दिलेल्या स्थगिती विरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली होती. सदर याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने निकाली काढली असून त्यानुसार शासन निर्णयावरील स्थगिती कायम राहिली आहे. तथापि, मा.उच्च न्यायालयामध्ये मूळ याचिका अद्याप प्रलंबित असून सदर प्रकरणात शासनाची बाजू मांडण्याकरिता विशेष अभियोक्त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, अधिवासी विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी जास्त जागा उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या नियमामध्ये बदल करता येतील का, याबाबत कायदेशीर बाबी तपासण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे सावंगा व आमला (ता.अमरावती) व मौजा काटपूर (ता.मोर्शी) येथील नदीतील गाळ काढून रुंदीकरण व खोलीकरण करण्याबाबत**

**(१८) * ८८०६९ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील मौजे सावंगा व आमला (ता.अमरावती) व मौजा काटपूर (ता.मोर्शी) येथील शासनाच्या नदी पुनर्जीवन योजनेंतर्गत नदीतील गाळ काढून रुंदीकरण व खोलीकरण करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी यांना लेखी पत्रान्वये विनंती करुनही आजपावेतो कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची चौकशी करुन नदी पुनर्जीवन योजनेंतर्गत नद्यांचे गाळ काढून रुंदीकरण व खोलीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) मौजा काटपूर हे गाव जलयुक्त शिवार अभियानात समाविष्ट असल्यामुळे या गावात कार्शी नदीचे खोलीकरण व रूंदीकरणाची तसेच सिमेंट नाला बांधाची कामे करण्यात आली आहेत.

मौजा सावंगा व आमला (ता.अमरावती) गावे जलयुक्त शिवार अभियानात समाविष्ट नाहीत. तथापि, यासंदर्भात सदर गावातील नदी पुनर्जीवनाची कामे करण्याकरिता सर्वेक्षण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आकुर्डे (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथे गव्याच्या हल्ल्यामध्ये दोन व्यक्तींचा झालेला मृत्यू

**(१९) * ८७०४९ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकुर्डे (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथे गव्याच्या हल्ल्यामध्ये पत्रकार रघुनाथ शिंदे व अनिल पोवार यांचा दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास मृत्यु झाला असून जंगली प्राण्यांचा वावर मानवी वस्तीकडे वाढत असल्याने वन्यप्राण्यांवर वेळीच निर्बंध आणण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार होणाऱ्या वन्यप्राण्यांचे हल्ले वाढत असताना वनविभागाकडून याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मानवी वस्तीकडे वन्यप्राण्यांचा वावर होऊ नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मानव वन्यप्राणी संघर्ष रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांची गस्ती पथके निर्माण करण्यात आली असून त्यांच्या मार्फत वन्यप्राण्यांना त्यांचे नैसर्गिक अधिवासात पाठविणेची कार्यवाही करण्यात येते.

• मानव वन्यप्राणी संघर्ष रोखण्याच्या दृष्टीने वनअधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येते.

• पारंपरिक उपयोजनांबरोबरच वन्यप्राण्यांना मानवी वस्तीत येण्यासाठी अटकाव करण्याच्या दृष्टीने वनक्षेत्राच्या वनहद्दींवर वन्यप्राणी प्रतिबंधक चर खोदण्यात आले आहेत.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी वनतळे, सिमेंट बंधारे व माती बंधारे बांधणे अशी कामे केली जातात.

• वनांवरील अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने सबसिडीवर एलपीजी गॅस शेगडी व सिलेंडर पुरवठा केला जात आहे.

-----------------

**मौजे करडी (जि.बुलढाणा) धरणातून पाण्याच्या होत असलेल्या गळतीबाबत**

**(२०) * ९१३९५ श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील मौजे करडी धरणाच्या गळतीच्या दुरूस्तीकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे लाखो लिटर पाणी वाहुन गेल्यामुळे सन २०१६-१७ च्या उन्हाळयामध्ये या धरणावर अवलंबुन असलेल्या ८ ते १० गावात पिण्याच्या पाण्याचे संकट ओढावले असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन सदर धरणाच्या गळतीच्या दुरूस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे. मौ.करडी धरणाच्या सांडव्याच्या पायामधून,मार्गदर्शक भिंत (Guide Wall) मधून व स्वयंचलित गेट मधून पाणी गळती निदर्शनास आल्यावर सदर स्वयंचलित गेटची दुरुस्ती करण्यात आली आहे. तथापि, करडी धरणातून शासन मान्य अथवा जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या प्रासंगिक आरक्षणामधून एकही पाणीपुरवठा योजना मंजूर नाही.

(२) धरणाच्या पायामधून व मार्गदर्शक भिंत (Guide Wall) मधून होणारी गळती रोखण्यासाठी विशेष दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## टिपेश्वर (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) अभयारण्यामधील मातीनाला बांधाची कामांबाबत

**(२१) * ८८६४३ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यातील टिपेश्वर अभयारण्यामध्ये सुरु असलेल्या मातीनाला बांधाची कामे निकृष्ट दर्जाची करण्यात येत असून सदर काम करणाऱ्या कंत्राटदाराचे अधिकाऱ्यांशी संगनमत करुन मातीनाला बांधाच्या कामाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

सन २०१६-१७ या वर्षात टिपेश्वर अभयारण्यात मातीनाला बांधाची दोन कामे करण्यात आली आहेत. सदर कामे चांगल्या दर्जाची असून त्यामध्ये कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा काटी (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील नैसर्गिक आपत्तीमध्ये मंजूर घरकुलांच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(२२) * ९१६८३ श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा काटी (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील नैसर्गिक आपत्तीमध्ये मंजूर घरकुलांच्या कामात गैरव्यवहार झाला असल्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक १७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने या गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय व चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, चौकशीनुसार गैरकारभार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) दिनांक १७.६.२०१७ रोजीचे निवेदन मा.मंत्री (ग्राम विकास) कार्यालयामार्फत “तात्काळ चौकशी करून अहवाल सादर करणेत यावा” या निर्देशासह मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे दि.१९.७.२०१७ रोजी पाठविण्यात आले आहे.
(३) दिनांक १७.६.२०१७ च्या निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करुन उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील मनोरुग्णालयात तीन मनोरूग्णांच्या झालेल्या हत्यांबाबत**

**(२३) * ८५८०२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील मनोरूग्णालयात उपचार घेत असलेले मनोरूग्ण जयंत नरेकर यांचा दिनांक १७ सप्टेंबर, २०१६ रोजी मृत्यू झाला, मालती पाठक यांचा गळा आवळून खून करण्यात आला असतांनाच एका ६५ वर्षीय अज्ञात मनोरूग्णाचा डोक्याला जखम झाल्याने दिनांक २५ सप्टेंबर, २०१६ रोजी मेडिकल, नागपूर येथे मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मनोरुग्णालयात झालेले मृत्यू अनैसर्गिक असल्याच्या नोंदी शवविच्छेदन अहवालात असून मनोरुग्णालयात मनोरूग्णांना जबर मारहाण करण्यात येत असल्याने त्याच मारहाणीत या मनोरुग्णांचा मृत्यू झाला

असल्याची माहिती दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गंभीर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल वैद्यकीय अधिक्षकांकडे सोपविण्यात आल्यानंतरही दोषी व्यक्तींवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

या तिघांचाही उपचारा दरम्यान मृत्यू झाला नसून अनैसर्गिकरित्या मृत्यू झाला.
(३) हे खरे नाही.
(४) या तीनही प्रकरणी पोलीस स्टेशन, मानकापूर, जि.नागपूर यांच्यामार्फत तपास सुरु आहे. श्री.जयंत नरेकर यांचे मृत्यू प्रकरणी संबंधित अधिपरिचारिका व पुरूष परिचर यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये विभागीय चौकशीची कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोरीवली-पूर्व (मुंबई) येथील दहिसर नदीवर पूल बांधण्याबाबत**

**(२४) * ८८२६०   श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :**   सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरीवली पूर्व (मुंबई) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील चुनापाडा येथील दहिसर नदीवर पूल नसल्याने सदरहू उद्यानामध्ये वास्तव करित असलेल्या ११ आदिवासी पाडयातील रहिवाशांची पावसाळयात गैरसोय होत असून बाहेरील घटकांशी संपर्क तुटत असल्याने ४ महिने लहान मुलांची शाळाही बंद होत असल्याने सदरहू ठिकाणी पूल बांधण्याची मागणी गेल्या ४ वर्षापासून

सातत्याने मा.मुख्यमंत्री व मा.वने मंत्री, यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने दहिसर नदीवर पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली येथे चुनापाडा नावाची आदिवासी वस्ती अस्तित्वात आहे. सदर वस्तीमध्ये जाण्यायेण्याकरीता जून्या बंधाऱ्याचा वापर करण्यात येत आहे.

सदर बंधाऱ्याचे धूप झालेल्या भागात भरण करुन पाणी जाण्याच्या गेटवर फळ्या टाकून तात्पूरती स्वरुपाची व्यवस्था करण्यात आली आहे.

सदर वस्तीतील लोकांकडून पूल बांधण्याची लेखी मागणी करण्यात आली असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मतीमंद व अन्य मुलांसाठी बालसुधारगृहे चालविणाऱ्या संस्थांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत

**(२५) * ९०८२१ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मतीमंद मुलांसाठी तसेच अन्य मुलांसाठी बालसुधारगृहे चालविणा-या संस्थाना दिल्या जाणाऱ्या अनुदानात दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजीपासून दुप्पटीहून अधिक वाढ करावी असा आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने शासनाला दिला असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बालसुधारगृहातील मुलांमध्ये प्रत्येकी दरमहा २ हजार व प्रशासकीय खर्चासाठी ५०० रुपये द्यावेत असे निर्देशही मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आदेशानुसार बालसुधारगृहांचे अनुदान दुप्पटीने वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहीत याचिका क्र. १८२/२०१० मध्ये मा.न्यायालयाने दि. ७.४.२०१७ रोजी दिलेल्या आदेशामध्ये मतीमंद मुलांसाठी चालविण्यात येणा-या बालगृहाच्या सहायक अनुदानात वाढ करण्याचे निर्देश दिले आहेत.

(२) मतीमंद बालगृहांसाठी २०००/- प्रति प्रवेशित, प्रति माह तर सर्वसाधारण बालगृहांसाठी रु.१५००/- प्रति प्रवेशित, प्रति माह व इतर प्रशासकीय खर्चासाठी रु.५००/- इतकी वाढ करावी असे मा.उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत.

(३) शासनाच्या विविध विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित निवासी विद्यार्थ्यांच्या परिपोषण अनुदानात वाढ करण्यासाठीची बाब मा.न्यायालयाच्या निर्देशापूर्वीच शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय दि.१.३.२०१६ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग, महिला व बालविकास विभाग यांच्या अंतर्गतच्या अनुदानित निवासी संस्थाना देण्यात येणा-या परिपोषण अनुदानात वाढ करण्यासाठी मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली अभ्यासगटाची नेमणूक करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयातील जलसंधारणाची कामे विहित मुदतीत पूर्ण न करता देयके काढल्याबाबत

**(२६) * ८६९९१ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील जलसंधारणाची कोट्यवधी रूपयांचे कामाचे कंत्राट वॉटर फ्रंट कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीला देण्यात आले असून या कंपनीने

अनेक कामे विहीत मुदतीत पूर्ण न करता देयके काढली असल्याची बाब दिनांक १९ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव बुलढाणा जिल्ह्यातील अनेक जलसंधारणाची कामे प्रलंबीत असल्याने याबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्याबाबत व जलसंधारणची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

मे. वॉटर फ्रंट कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा. लि. पुणे या कंपनीला एकूण १३ योजनांच्या कामांचे कंत्राट देण्यात आलेले आहे.

१) घळभरणी पुर्ण झालेल्या योजना-५

२) शेतकऱ्यांच्या विरोधामुळे सुरु न झालेल्या योजना-२

३) शेतकऱ्यांच्या विरोधामुळे विलंबाने सुरु झालेल्या योजना-१

४) शेतकऱ्यांच्या विरोधामुळे सुरु होऊन सद्यस्थितीत बंद झालेल्या योजना-४

५) क्षेत्रिय व तांत्रिक अडचणीमुळे सद्यस्थितीत बंद असलेल्या योजना-१

कोणत्याही कामाचे अंतिम देयक अद्याप अदा केलेले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मोखाबर्डी (ता.भिवापूर, जि.नागपूर) उपसा सिंचन योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(२७) * ९२७३६ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पातंर्गत येत असलेल्या मोखाबर्डी (ता.भविापूर, जि.नागपूर) उपसा सिंचन योजनेतील २२४ कोटी रुपयांची महत्वाची कामे भुसावळ येथील तापी प्रिस्ट्रेस्ड प्राडक्टस लिमिटेड या कंपनीला देण्यात आले असून ही सर्व कामे २४ महिन्यांच्या आत करावयाची होती परंतु संबंधित कंत्राटदाराने अधिकाऱ्यांसमवेत संगनमत करून कामाची मुदत वाढवून अजूनही कामे पुर्ण केली नसतांनाही १९० कोटी कंत्राटदारास अदा करण्यात आले असल्याची माहिती माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पांतर्गत मोखाबर्डी उपसा सिंचन योजनेच्या शिर्ष कामांतर्गत “उर्ध्वगामी” नलिका मांडणी, जोडणी, चाचणी इत्यादी सहीत स्थापत्य कामे व मॅनिफोल्ड जोडणी, पंपीग मशिनरी पुरवठा व रचना करणे, स्वीचयार्ड व व्यवस्थापन इत्यादी कामांचा समावेश असलेला करारनामा मे.तापी प्रिस्ट्रेस्ड प्रॉडक्ट लिमिटेड.अंजले, ता.यावल, जि.जळगांव यांच्याशी रु.२२४.३७ कोटी किंमतीसाठी करण्यात येऊन दिनांक ०६/०७/२००६ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले. करारनाम्यानुसार सदर बांधकाम ३० महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करावयाचे होते. सदर करारनाम्यानुसार केलेल्या कामाच्या अनुषंगाने जून २०१७ पर्यंत रु.१८७.६१ कोटी एवढी रक्कम अभिकरणास अदा करण्यात आली आहे. भूसंपादनाच्या अडचणी, पुरेसा निधी वेळेवर उपलबध न होणे, कंत्राटदाराच्या वसुली विरोधात प्रकरण न्यायप्रविष्ट असणे व त्यामुळे कंत्राटदाराने काम बंद ठेवणे इत्यादी कारणांमुळे कामास मुदतवाढ देण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

(४) भूसंपादनाची अडचण तसेच निधी अभावी कंत्राटदार अपेक्षीत गतीने काम करु शकला नाही. विषयांकित बांधकामाची निविदा “क” प्रकारची असून मूळ अंदाजपत्रकाप्रमाणे व निवीदेतील शर्तीनुसार उपसा सिंचन योजनेचे संकल्पन कंत्राटदाराने केल्यानंतर पाईपच्या वजनामध्ये घट झाल्याने स्टील बचतीची शासनाने वसुली केल्यामुळे, रु.१६.९३ कोटी वसुली विरोधात लवाद नेमला गेला व सदर प्रकरण मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे न्याय प्रविष्ठ असल्यामुळे बांधकामास विलंब झाला.

-----------------

**आगर (जि.अकोला) येथील पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**(२८) * ९०४७९ श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आगर (जि.अकोला) येथे नागरिकांकडे गाव नमुना ८ नसल्याने पंतप्रधान आवास योजनेस पात्र असूनही त्यांना घरकुलाच्या लाभापासून वंचित रहावे लागल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावात खुली जागा उपलब्ध नसल्याने जागा उपलब्ध करुन देण्याबाबत वंचित लाभार्थ्यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वंचित लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देऊन घरकुल योजनेच्या लाभ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही कली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) नाही.

(३) प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व अन्य राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र परंतु जागे अभावी वंचित असलेल्या लाभार्थ्यांना जागा खरेदीसाठी अर्थसहाय देण्यासाठी “पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय योजना” चा सुधारित शासन निर्णय

दि.१४ जुलै, २०१७ रोजी निर्गमित केला आहे. सदरच्या योजनेनुसार घरकुल बांधकामासाठी जागा नसलेल्या लाभार्थ्यांना ५०० चौ.फूट जागा खरेदीसाठी रु.५०,०००/- पर्यंत अर्थसहाय उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**येळेवाडी (ता.माढा, जि.सातारा) येथे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत नवीन बंधारा बांधण्याबाबत**

**(२९) * ९१२१७ श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येळेवाडी (ता.माढा, जि.सातारा) येथे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत बांधण्यात आलेला निकृष्ट बंधारा पाडून त्याजागी नवीन बंधारा बांधण्याचे आदेश प्रशासनाने ठेकेदाराला दिले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, नव्याने बंधारा बांधण्याचे काम ठेकेदाराने अदयाप सुरु केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करून बंधारा बांधण्याचे काम सुरु करण्यासाठी व ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर काम जलयुक्त शिवार अभियान मधील नसून टंचाई मधील आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, सातारा यांनी चौकशीचे आदेश दिले होते. त्यानूसार कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, सातारा व उपविभागीय अधिकारी (प्रांत), दहिवडी यांनी प्रत्यक्ष कामांच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली व कामाची गुणवत्ता योग्य नसल्याने काम पाडण्याचे आदेश दिले. त्यानुसार संपूर्ण बंधाऱ्याचे काम काढून टाकण्यात आले.

कार्यक्षेत्रावर पाणी व वाळू उपलब्ध होत नसलेने ठेकेदारास काम सुरु करणेस विलंब झालेला आहे व याबाबत ठेकेदाराने विनंती अर्ज दिलेला आहे. प्रस्तुत कामास विलंब केल्याबद्दल ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. बंधारा बांधण्याचे काम दि.०६ जुलै, २०१७ पासून नव्याने सुरू करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैद्यकीय महाविद्यालयातील नोकरीचे आमिष दाखवून बेरोजगारांची केलेली फसवणूक

**(३०) * ८५२८९ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय महाविद्यालयातील नोकरीचे आमिष दाखवून वैद्यकीय शिक्षण संचालकांचे बनावट नियुक्तीपत्रे व स्वाक्षरीचा वापर करुन अनेक बेरोजगारांची लाखो रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर, मिरज व कोल्हापूर येथील महाविद्यालयात बनावट नियुक्तीपत्रे घेऊन आलेल्या व्यक्तींना अटक करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार फसवणूक करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे बनावट दस्तऐवजाच्या आधारे वैयक्तिक फसवणुकीसाठी करवीर पोलीस स्टेशन, कोल्हापूर येथे फौजदारी गुन्हयाची नोंद झाली आहे. तसेच बै.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पुणे या संस्थेच्या सूचना फलकावर विविध पदांवरील निवडीची बनावट निवड यादी अज्ञात व्यक्तींकडून प्रदर्शित करण्यात आल्याचे प्रकरण निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

(४) बनावट नियुक्तीपत्राच्या आधारे नियुक्ती मागण्याकरीता आल्याचे एकही प्रकरण निदर्शनास आले नाही. तथापि पुणे येथील प्रकरणाबाबत संबंधित अधिष्ठाता यांनी बंड गार्डन, पोलीस स्टेशन पुणे येथे तक्रार दाखल केली आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## राज्यात तृतीयपंथी कल्याण मंडळ कार्यान्वित करण्याबाबत

**(३१) * ८६४७१ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तृतीयपंथाच्या कल्याणासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरहू कल्याणकारी मंडळ तातडीने कार्यान्वित करण्याबाबतची मागणी तृतीयपंथ संघटनांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या वतीने तृतीय पंथाच्या कल्याणासाठी विविध पाच योजना राबविण्याचे प्रस्तावित केले असून त्याची अंमलबजावणी राज्य शासनाकडून करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तृतीय पंथाच्या कल्याणाच्या प्रस्तावित योजना राबविण्याबाबत व कल्याणकारी मंडळ कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) राज्यातील तृतीयपंथी यांच्या कल्याणासाठी व त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण आणि कल्याणमंडळ स्थापन करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय दि. ०६ सप्टेंबर, २०१४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(२) होय.
(३), (४) व (५) केंद्र शासनाच्या वतीने तृतीयपंथाच्या कल्याणासाठी राबविण्यात येणार असलेल्या विविध पाच योजना राज्य शासनामार्फत राबविण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडून राज्य शासनाचे अभिप्राय मागविले आहेत. याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. तथापि तृतीयपंथी यांच्या कल्याणासाठी तृतीयपंथी कल्याण मंडळ कार्यान्वित करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**हिंगोली जिल्ह्यासाठी नदी पुनर्जीवन योजनेंतर्गत निधी मिळण्याबाबत**

**(३२) * ९२३०९ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यासाठी नदी पुनर्जीवन योजनेंतर्गत साडे पाच कोटी रुपयाचा निधी देण्यात येईल त्यापैकी अंबाळा नदीवर एक कोटी खर्चून सिमेंट नालाबांध, गोमदा नदीवर ९० लाख खर्चुन तीन सिमेंट नालाबांध व कयाधू नदीवर तीन कोटी खर्चुन सिमेंट नालाबांध बांधले जातील असे आश्वासन मा.जलसंधारण मंत्री यांनी दिले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी तात्काळ नदी पुनर्जीवन योजने अंतर्गत निधी मिळण्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी

पाठविलेला असतानाही सदरहू प्रस्तावाला अद्यापही मंजुरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हिंगोली जिल्ह्यासाठी नदी पुनर्जीवन योजने अंतर्गत निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी शासनास सादर केलेला नदी पुनर्जीवन प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

-----------------

## वाडा (जि.पालघर) तालुक्यात जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाने बांधलेल्या बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३३) * ८६४९३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यात जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करुन गेल्या पंधरा वर्षात शेकडो बंधारे बांधली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बंधाऱ्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने या बंधाऱ्यात पाणीच राहत नसल्याची बाब दिनांक २ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बंधाऱ्यांची पाहणी शासनाने केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत व निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) मागील १५ वर्षात म्हणजे सन २००२ पासुन पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यात ८ के.टी.बंधारे व १७२ पक्के बंधारे बांधण्यात आलेले आहेत. त्याकरिता अनुक्रमे रुपये ३०३.२२ लक्ष व रुपये १२२२.२२ लक्ष असे एकुण रुपये १५२५.२२ लक्ष इतका खर्च आलेला आहे.

(२) अशी बाब नाही. स्थानिक छोट्या/मोठ्या नदी नाल्यावर बांधण्यात येणारे पक्के बंधारे हा जलसंधारणाचा उपचार असुन या मध्ये दिर्घकाळ पाणी साठा टिकुन रहाणे अपेक्षित नाही. वाहुन जाणारे पाणी जमिनीत मुरवणे हा या बंधाऱ्याचा उद्देश आहे.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिंदर-त्रिंबक (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या दोन गावांना जोडणाऱ्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३४) * ८५०३३ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंदर-त्रिंबक (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या दोन गावांना जोडणा-या ५.५ कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या कामास मुख्यमंत्री सडक योजनेतून ३ कोटीचा निधी मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यासाठी पुलाच्या होणाऱ्या कामात वाळू ऐवजी खडीची पावडर वापरुन ठेकेदार निकृष्ट दर्जाचे बांधकाम करीत असल्याने संपूर्ण कामाची गुणवत्त्ता नियंत्रकामार्फत चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांनी कुडाळ येथील कार्यकारी अभियंत्याकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार या प्रकरणाची चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे पुलाचे बांधकाम करणा-या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) चिंदर-त्रिंबक (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या रस्त्याला मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये रु.२७८.१८ लक्ष इतक्या रक्कमेची प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली असून सदर कामाच्या ५ वर्षे नियमित देखभाल व दुरुस्तीसाठी रु. १५.१६ लक्ष इतकी रक्कम मंजूर आहे.

(२) होय खरे आहे.

(३)योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांनी सदर कामास त्वरीत भेट देऊन Crushed Sand (कृत्रिम वाळू) वापरुन केलेले कॉजवेचे क्रॉंक्रीटचे काम बंद केले व सदरचे काम जेसीबीच्या सहाय्याने मक्तेदाराच्या खर्चाने काढून टाकण्यात आले. सदरचे काम वाळू वापरुन पुन:श्च बांधण्यात आले असून काम सुस्थितीत आहे.

संबंधीत मक्तेदारास कार्यकारी अभियंता सिंधुदुर्ग यांनी यापुढे निविदेच्या अटी शर्तीनुसार काम करण्याच्या सक्त सुचना दिल्या आहेत.

सदरच्या कामास राज्य गुणवत्ता निरीक्षक यांनी दि.१७/५/२०१७ रोजी भेट देऊन तपासणी केली असून काम समाधानकारक असल्याचा शेरा दिला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हयातील मजुर कामगार सहकारी संस्थांमार्फत केलेल्या वन विभागाच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३५) * ८५८२९ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मजुर सहकारी संस्थांमार्फत केलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामांमध्ये सुमारे ५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.वनेमंत्री, सचिव, वनविभाग यांचेकडे तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे वनविभागाच्या संगनमताने सुरु असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराची चौकशी शासनाने केली आहे काय व चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, चौकशीनुसार या गैरव्यवहारातील सबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) दैनिक प्रहारच्या दिनांक १९.०६.२०१७ रोजीचे वृत्तपत्रात "चौदा कोटीच्या कामात भ्रष्टाचार ठाणे वनविभागातील उप वनसंरक्षक कार्यालयाने ठाणे जिल्हयातील मजूर कामगार सहकारी संस्थांमार्फत केलेल्या १४ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असून, या कामाची चौकशी करुन दोषींविरुध्द गुन्हे दाखल करण्याची मागणी राज्याचे वनमंत्री व वन विभागाच्या सचिवांकडे करण्यात आली आहे" असे वृत्त प्रसिध्द झालेले आहे. सदर वृत्तपत्रातील कात्रण विभागीय संपर्क अधिकारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मंत्रालय, मुंबई यांचेकडून दि.१९.०६.२०१७ रोजी प्राप्त झाले आहे.

(२), (३) व (४) दैनिक प्रहार वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांनी प्रकरणाची चौकशी करण्याकरीता विभागीय वन अधिकारी (दक्षता), ठाणे यांचे अध्यक्षतेखाली त्रिसदस्सीय समिती स्थापन केली असून, या प्रकरणी चौकशी सुरु असून, चौकशी अंती गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्यास नियमानुसार तात्काळ योग्य ती कारवाई करण्यात येईल.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील मौजे कौढर ते चिवेली (ता.चिपळूण) आणि मौजे रानवी-धोपावे (ता.गुहागर) या रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(३६) * ८५३२७ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील मौजे कौढर ते चिवेली (ता.चिपळूण) आणि मौजे रानवी-धोपावे (ता.गुहागर) या रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे दोन्ही ठिकाणी एस.टी.ची वाहतूक देखील बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांचे डांबरीकरण व्हावे म्हणून दिनांक १ मे, २०१७ रोजी धोपावे, रानवी येथील ग्रामस्थांनी धोपावे येथे तर दिनांक ८ मे, २०१७ रोजी चिवेली येथील ग्रामस्थांनी मा.उपविभागीय अधिकारी कार्यालय, चिपळूण येथे उपोषण करून आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दोन्ही रस्त्यांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० मे, २०१७ रोजी व त्याआधीही सातत्याने पत्रव्यवहार करूनदेखील त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या दोन्ही रस्त्यांच्या डांबरीकरण कामाला निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) चिपळूण तालुक्यातील मौजे मजरे कौंढर चिवेली रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र. ५२ या रस्त्यावरील एस.टी.वाहतुक बारमाही सुरु आहे.

गुहागर तालुक्यातील वेलदूर नवानगर धोपावे रानवी रस्ता ग्रामीण मार्ग क्र.१ या रस्त्यावरील एस.टी.वाहतूक दि. १.४.२०१७ ते २९.५.२०१७ पर्यत बंद होती. तथापि, सद्यस्थितीत वाहतुक सुरु आहे.

(२) होय.

(३) स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्रे जिल्हा परिषदेकडे प्राप्त झाली आहेत. परंतु त्याकडे जिल्हा परिषदेने दुर्लक्ष केले आहे, हे खरे नाही.

(४) चिपळूण तालुक्यातील मौजे कौंढर चिवेली रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.५२ असून या रस्त्याची एकूण लांबी ११.०० कि.मी. आहे. या रस्त्याचा पृष्ठभाग संपूर्ण डांबरी आहे. या रस्त्याच्या ३/०० ते ४/५०० कि.मी.या भागामध्ये खड्डे भरुन बी.बी.एम. कारपेट, सिलकोट करण्याचे रु.२८.२५ लक्षाचे काम सन २०१५-१६ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून करण्यात आले आहे. या रस्त्याच्या ९.१०० कि.मी. लांबीची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तथापी, या रस्त्यावर बारमाही एस.टी वाहतुक सुरु आहे.

वेलदूर नवानगर धोपावे रानवी ग्रामीण मार्ग क्र.१ आहे. या रस्त्याची एकूण लांबी ८.७०० कि.मी. इतकी असून संपूर्ण पृष्ठभाग डांबरी आहे.या संपूर्ण लांबीपैकी ३.१५० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे. व ५.५५० कि.मी. लांबी पृष्ठभाग खराब झाला आहे.

या रस्त्याचा ०/०० ते २/२०० कि.मी. हा भाग धोपावे येथील फेरीबोटीला जोडणारा मार्ग असून सदरचा पृष्ठभाग हा सुस्थितीत असून एस.टी.वाहतूक सुरळीत आहे.

सन २०१६-१७ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ४/०० ते ४/५०० कि.मी. लांबीतील मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

३/०० ते ४/०० कि.मी. लांबीमध्ये डांबराद्वारे खड्डे भरण्यात आले आहेत.

२/२०० ते ३/००, ४/५०० ते ५/६०० व ८/१०० ते ८/२५० या खराब पृष्ठभागावरील खड्डे खडीद्वारे व ३/०० ते ४/००कि.मी.लांबीतील खड्डे डांबराद्वारे भरण्यात आले असून एस. टी.वाहतूक पुर्ववत सुरु करण्यात आली आहे.

वरील दोनही रस्त्यांचे उर्वरीत नादुरुस्त लांबीतील दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांतर्गत उपलब्ध निधी व निकषाच्या अधिन राहून मंजूरीसाठी टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डोंगरी (मुंबई) येथील बाल सुधारगृहातील ३० मुले गेल्या ३ वर्षात पळून गेल्याबाबत**

**(३७) * ८६५६७ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंगरी (मुंबई) येथील बाल सुधारगृहातील १२ ते १८ वर्ष वयोगटातील ३० मुलांनी गत ३ वर्षात पलायन केल्याची बाब दिनांक १० जून २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पळून गेलेल्या मुलांपैकी किती मुलांना पकडून बालसुधारगृहात पुन्हा आणण्यात आले व किती मुलांचा अद्याप शोध लागलेला नाही,

(३) असल्यास, या बाल सुधारगृहात मुले पळून जाण्याच्या घटना वारंवार घडू नयेत यासाठी शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय.

मुंबईतील डोंगरी येथील बालनिरीक्षणगृहातून सन २०१४-१५ ते सन २०१६-१७ या तीन वर्षात ४२ मुलांनी पलायन केले आहे. त्यापैकी १६ मुलांना परत आणण्यात आले आहे.

(३) या बाल सुधारगृहात दाखल मुले पळुन जाऊ नयेत म्हणून उपाययोजनेअंतर्गत मुलांचे समुपदेशन, सुरक्षा व्यवस्था कडक करणे, मुलांच्या आरोग्य व आहारा विषयी दर्जा सुधारणे, परिसर स्वच्छता, परिविक्षा अधिकारी यांचे मार्फत पालकांचा लवकरात लवकर शोध घेणे, मुलांना व्यवसाय प्रशिक्षण देणे व करमणुकीबाबत दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अंगणवाड्यांच्या पोषक आहारासाठी स्थानिक महिला**
**बचत गटांना कंत्राट देण्याबाबत**

**(३८) * ८५९७८ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाड्यांना आहार पुरवठा करण्याचे कंत्राट महिला व बालविकास विभागाने ज्या महिला बचत गटाचे पदाधिकारी पुरुष सदस्य आहेत अशा व्यंकटेश्वर महिला औद्योगिक उत्पादन सहकारी संस्था, महालक्ष्मी महिलागृह उद्योग एवं बालविकास बहुउद्देशिय औद्योगिक सहकारी संस्था आणि महाराष्ट्र महिला सहकारी गृह उद्योग संस्था अशा मा.सर्वोच्च न्यायालयाने अपात्र ठरविण्यात आलेल्या १८ बनावट संस्थांना दिनांक २९ एप्रिल, २०१७ रोजीच्या आदेशानुसार रु.४८०० कोटीचे कंत्राट देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे दिनांक १९.०४.२०१७ च्या अंतरिम निर्णयाच्या अधिन राहून १८ महिला मंडळ / महिला बचत गट / महिलासंस्थांना THR पुरवठयाचे काम मंजुर करण्यात आलेले आहे.

(२) सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे न्यायप्रविष्ठ आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ए.एन.एम. व जी.एन.एम. या नर्सिंग कोर्स शिकणाऱ्या विजाभज, विमाप्र व इ.मा.व प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती पुन्हा सुरु करण्याबाबत**

**(३९) * ८५९१९ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ए.एन.एम. व जी.एन.एम.या नर्सिंग विषयात शिक्षण घेणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती राज्य शासनाने बंद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शिष्यवृत्ती पुन्हा सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मा.मुख्यमंत्री यांना विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या सन १९९८ च्या मार्गदर्शक सूचनामध्ये नमूद केलेल्या अभ्यासक्रमांकरीता सन २००३-०४ मध्ये राज्य शासनाने विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना लागू केलेली असून, त्यामध्ये ए.एन.एम. व जी.एन.एम या नर्सिंग अभ्यासक्रमाचा समावेश नाही.

(२) होय.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यात 'मागेल त्याला बोडी' योजना राबविण्याबाबत**

**(४०) * ९११०५ श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यात शेतकऱ्यांना शेती सिंचनासाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शासनाने 'मागेल त्याला बोडी' ही योजना सुरू केली असतानाही सन २०१६-१७ या वर्षामध्ये या तालुक्यात कृषी विभागाअंतर्गत एकही काम करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सालेकसा तालुक्यात अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या २५ हजारांच्यावर असून शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाण्याची सुविधा नसून कृषी अधिकारी, कृषी मंडळ अधिकारी यांच्या निष्काळजीपणामुळे तालुक्यातील शेतकरी संकटात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शेतकऱ्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळावा व 'मागेल त्याला बोडी' योजना योग्यप्रकारे राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही. सालेकसा (जि.भंडारा) तालुक्यात "मागेल त्याला बोडी" या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये एकूण २३ इतके अर्ज प्राप्त झालेले असून, त्यापैकी १७ अर्ज पात्र आहेत. त्यानुसार १३ शेतकऱ्यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले असून, बोडीची २ कामे पूर्ण झाली आहेत.

(२), (३) व (४) नाही. मागेल त्याला बोडी या योजनेची सालेकसा तालुक्यात मोठ्या प्रमाणात प्रचार व प्रसिध्दी करण्यात आली आहे. याकरीता ग्रामपंचायत स्तरावर सभा घेण्यात आल्या आहेत. तसेच, वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आली असून, शेतकऱ्यांना भेटी देवून सदर योजनेचे महत्व पटवून देण्यात आले आहे. सदर योजनेची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेडवाई (ता.जिवती, जि.चंद्रपूर) गावातील चुनखडीच्या खाण प्रकल्पाकरीता वनजमिन देण्याच्या प्रस्तावाबाबत

**(४१) * ९२७५३ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेडवाई (ता.जिवती, जि.चंद्रपूर) गावातील चुनखडीच्या खाण प्रकल्पाकरीता २९३.१२ हेक्टर वनजमिन वळती करण्याचा प्रस्ताव दिनांक १५ जून २०१७ रोजीच्या वनसल्लागार समितीच्या बैठकीत मांडण्यात आला असून या चुनखडी खाण प्रकल्पाकरीता ६९५.१२ हेक्टर वनजमिन लागणार असल्याने २९३.१२ हेक्टर वनजमिन पहिल्या टप्यात दिल्या जाणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाकरीता मागणी केलेल्या वनजमिनी दिल्यास वन्यजीवांच्या संचारमार्गावर त्याचा परिणाम होणार असल्याने सदरहू वनजमिन न देण्याची मागणी पर्यावरण, वने आणि हवामान बदल विभाग यांच्याकडे वन्यजीवतज्ञ व पर्यावरणवाद्यांनी पत्रान्वये केली असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचा तपशिल काय आहे,

(४) असल्यास, त्यानुसार चुनखडी खाण प्रकल्पाला मान्यता देण्याऐवजी दोन व्याघ्र प्रकल्पातील कॉरिडॉर कसा सुरक्षित राखता येईल यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० मधील कलम २ (iii) अंतर्गत मौ.शेडवाई, ता.जिवती, जि.चंद्रपूर येथे चुनखडीच्या खाण प्रकल्पासाठी मे.अभिजीत न्यू इंडिया सिमेंट प्रा.लि., नागपूर यांचा २९३.१२

हेक्टर तर मे.मुरली इंडस्ट्रीज लि.,नागपूर यांचा ६९५.७२ हेक्टर वनजमीन मंजूरीकरिताचे प्रस्ताव दि.०३.०१.२०१७ रोजीच्या पत्रांन्वये राज्य शासनाने पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे पाठविले आहेत. केंद्र शासनाच्या वन सल्लागार समितीच्या दि.१५.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत मे.अभिजीत न्यू इंडिया सिमेंट प्रा.लि.,नागपूर यांच्या २९३.१२ हेक्टर वनजमीन मागणीच्या प्रस्तावाबाबत चर्चा करण्यात आली. सदर बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे प्रकरण प्रलंबित असल्याने मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयापर्यंत या प्रकरणी परवानगी न देण्याची शिफारस वनसल्लागार समितीने केली असल्याचे दिसून येते.

(२) व (३) सदर प्रकल्पामुळे वन्यजीवांच्या संचार मार्गावर परिणाम होणार असल्याने उक्त वनजमीन प्रदान न करण्याबाबतच्या मागणीचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(४) व (५) प्रस्तावित वनक्षेत्र व्याघ्र संचारमार्गाचा (Tiger Corridor) भाग नाही.

-----------------

**राज्य कामगार विमा योजनेच्या विमा रुग्णालयांमध्ये सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(४२) * ८५१२७ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाराष्ट्र कामगार विमा योजनेचे ९४ लाख ७ हजार ४४० लाभार्थ्यांना १४ विमा रुग्णालयामार्फत वैद्यकीय उपचार केले जात असून आरोग्य संचालनालयाच्या प्राप्त माहितीनुसार या विमा रुग्णालयातील ४ हजार १२५ खाटांपैकी केवळ २ हजार ३२० खाटा फक्त कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमा रुग्णालयातील वैद्यकीय चाचण्या करण्यासाठी आवश्यक असलेले तंत्रज्ञ व वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदेही भरलेली नाहीत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, विमा रुग्णालयाचे प्रशासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडे नसून आरोग्य विभागाने दुसऱ्या विभागाकडे दिल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, राज्यातील कामगारांच्या आरोग्याच्यादृष्टीने विमा रुग्णालयांमध्ये अद्यावत सोयी सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

राज्यातील १३ राकावियो रुग्णालयामध्ये एकूण ४१०० खाटांची क्षमता असून शासन निर्णय दि. ०१.१०.२००७ अन्वये सदर १३ रुग्णालयांकरीता एकूण २०५० खाटा मंजुर करण्यात आल्या आहेत.

(२) अंशतः खरे आहे.

सद्यस्थितीत राज्य कामगार विमा योजनेत प्रयोगशाळा तंत्रज्ञांचे एकूण ६० मंजुर पदापैकी २० पदे भरलेले आहेत. तसेच, वैद्यकीय अधिकारी गट-अ ची एकूण २२१ पदांपैकी एकूण १३३ पदे भरलेली आहेत. तथापि, ज्याठिकाणी तंत्रज्ञांचे पदे रिक्त आहेत त्याठिकाणी विमाधारकांना खाजगी संस्थेमार्फत विनामुल्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येते.

(३) हे खरे नाही.

(४) रिक्त पदे भरणे तसेच वैदयकीय उपकरणे व यंत्रसामुग्री खरेदी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत असून,राज्य कामगार विमा योजनेकरीता राज्यस्तरीय स्वायत्त संस्था स्थापित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे..

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नापणे (ता.वैभववाडी), सावडाव (ता.कणकवली) व आंबोली (ता.सावंतवाडी) धबधब्याच्या ठिकाणी पर्यटन केंद्रे उभारण्याबाबत**

**(४३) * ८४८६१ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नापणे (ता.वैभववाडी), सावडाव (ता.कणकवली) व आंबोली (ता.सावंतवाडी) आदी बारमाही वाहणाऱ्या धबधब्याच्या ठिकाणी देशी-विदेशी पर्यटक मोठया प्रमाणात येत असल्याने सदरहू ठिकाणी पर्यटन केंद्र विनाविलंब विकसीत करण्यात यावेत अशी पर्यटकांची सातत्याची मागणी विचारात घेवून जिल्हयाच्या मा.पालकमंत्री यांनी सदरहू ठिकाणी पर्यटनदृष्ट्या विकसीत करण्यासाठी २ कोटी रूपयांच्या निधीची घोषणा केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.पालकमंत्री यांनी २ कोटी रूपयांच्या निधीची तरतूद केल्याची घोषणा केल्यानंतरही अद्याप पर्यंत एकाही ठिकाणी पर्यटन केंद्रे उभारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन नापणे, सावडाव व आंबोली या ठिकाणी पर्यटन केंद्रे उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे. नापणे,सावडाव साठी रू.२.५० कोटींच्या कामांना मंजुरी देऊन रू.२.०० कोटी वितरीत केले आहेत. तसेच आंबोलीसाठी रू.१.९४ कोटींच्या कामांना मंजुरी देऊन रू.१.७५ कोटी वितरीत केले आहेत.

चांदा ते बांदा समितीने जिल्हास्तरीय यंत्रणांकडून/क्षेत्रीय यंत्रणांकडून तसेच क्षेत्रीय स्तरावरुन योग्य ती माहिती संकलित करुन त्या आधारावर योजना/कामे अंतिम केलेली आहेत.

नापणे, सावडाव व आंबोली या घटकांचे सविस्तर अंदाजपत्रक व जागा उपलब्ध करणेबाबत कार्यवाही सुरु असून जिल्हास्तरीय यंत्रणांकडून जागा उपलब्ध झाल्यावर या घटकांचे कार्यान्वयन करण्यात येणार आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यात नद्यांना पूर येऊन ग्रामीण भागातील दळणवळणाची व्यवस्था बंद झाल्याबाबत

**(४४) * ९१८२६ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यात अतिवृष्टी झाल्याने नद्यांना पूर येऊन ग्रामीण भागातील रस्त्याना, पूल मोऱ्यांना व पुलांना मोठ्या प्रमाणात हानी पोहोचल्याने अनेक गावे, वाड्या, वस्त्यांचा संपर्क तुटून दळणवळणाची व्यवस्था बंद झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पूरहानीमुळे नुकसान झालेल्या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था पूर्वपदावर आणण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: हे खरे आहे.
(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) सन २०१६-१७ मध्ये पुरहानीमुळे नुकसान झालेल्या रस्त्यांची व पुलांची दुरुस्ती करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने शासनास सादर केला होता. परंतु पुरहानी कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध न झाल्याने दिनांक २५ नोव्हेंबर,

२०१६ च्या पत्रान्वये रस्त्यावरील वाहतूक सुरळीत रहाण्याच्या दृष्टीने अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या रस्त्यांची/ पुलांची तातडीने दुरुस्ती होण्यासाठी जिल्हा परिषदांनी रस्ते व पुल दुरुस्ती गट अ व ड कार्यक्रमांतर्गत अशी कामे प्राधान्याने घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

त्याप्रमाणे जिल्हा परिषदेला उपलब्ध होणाऱ्या निधीमधून प्राथम्यक्रमाने टप्प्या-टप्प्याने कामे प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्हयात वनविभागाने वृक्ष लागवडीत केलेला गैरप्रकार**

**(४५) * ९२३२० श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून वृक्ष लागवडीसाठी विशेष उपक्रम राबविला जात असून नांदेड जिल्हयात वनविभागाने ४० हजार झाडे लावल्याचे दर्शविले असून प्रत्यक्षात मात्र वृक्ष लागवड केलीच नसल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा. पर्यावरणमंत्री नांदेड दौ-यावर आले असताना जामदारा आणि भवानीचा माळा या परिसरात अधिकारी आणि कर्मचारी यांच्या संगनमताने केवळ कागदावरच खड्डे आणि वृक्ष लावल्याची नोंद केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत व जिल्हयातील वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

२ कोटी वृक्ष लागवड योजनेंतर्गत शिराढोण (भवानीचा माळ) नियतक्षेत्र शिरढोण कक्ष क्र. ७७२/ A-२ सर्वे नं. १८३ या परिसरात खडडे खोदून १ जुलै २०१६ या एकाच दिवशी ८००० रोपांची लागवड करण्यात आली. तदनंतर ३२००० रोपांची लागवड करुन एकूण ४०००० रोपांची लागवड या ठिकाणी करण्यात आली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयात व्हेंटीलेटर मंजूरी असतानाही अद्यापही पुरवठा न केल्याबाबत

**(४६) * ९२८१३ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयात लहान व मोठी व्हेंटीलेटर मंजूरी असतानाही अद्यापही पुरवठा न केल्याने गरजू रुग्णांना खाजगी दवाखान्यात उपचार घ्यावे लागत असल्याचे माहे मे २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सदर रुग्णालयास जिल्हा वार्षिक योजना सन २०१७-१८ अंतर्गत निधी मंजूर करण्याबाबत लातूर ग्रामीण स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २४ मे, २०१७ रोजी मा.पालकमंत्री, लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, सदर सर्वोपचार रुग्णालयास व्हेंटीलेटर मंजूर असताना पुरवठा न करण्याची कारणे काय आहेत व सदर पुरवठा त्वरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औंध (जि.पुणे) येथील जिल्हा रुग्णालयात नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(४७) * ८८९७३ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा व शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे पुणे येथील ससून रुग्णालयात वैद्यकीय उपचार करण्यासाठी रुग्णांना जावे लागत असून या रुग्णालयावरील वैद्यकीय सोयींचा वाढता ताण कमी करण्यासाठी औंध येथील पुणे जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अत्याधुनिक वैद्यकीय यंत्र सामुग्रीने सुसज्ज असलेल्या औंध येथील पुणे जिल्हा रुग्णालयात शहर व जिल्ह्यातील मावळ, मुळशी, भोर व हवेली या तालुक्यातील व सातारा जिल्ह्यातील रुग्णाना वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणार असून राज्यातील गुणवंत विद्यार्थ्यांना वैद्यकीय प्रवेशाकरिता जागा उपलब्ध होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे येथील जिल्हा रुग्णालयाला संलग्न वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे. तथापि शासनाचा याविषयी अद्याप निर्णय झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भारतगाव (ता.दौंड, जि.पुणे) येथे राबविण्यात आलेल्या "हरियाली योजनेत" झालेला गैरव्यवहार

**(४८) * ९२८२४ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतगाव (ता.दौंड, जि.पुणे) येथे सन २००८ ते २०१३ या कालावधीत राबविण्यात आलेल्या "हरियाली योजनेत" गैरव्यवहार झाल्याचे दिनांक २२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दौंड तालुक्यातील खोर, बोरीऐंदी, भरतगाव, डाळिंब, भांडगाव या गावांचा या योजनेमध्ये समावेश असून सुमारे २६ लक्ष रुपयांचा निधी खर्च झाला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदरहू गैरव्यवहार करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) भरतगाव येथील तत्कालीन ग्रामसेविका यांचेविरुध्द भ्रष्टाचार व शासकिय निधीच्या अपहाराबाबत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयाकडे तक्रार प्राप्त झालेली आहे.

(२) हरियाली प्रकल्प ४ या योजनेतंर्गत दौंड तालुक्यात खोर-२, भांडगाव-२, भरतगांव -१, डाळींब-१ प बोरीऐंदी १ असे एकूण ७ पाणलोट मंजूर आहेत. तसेच सदर पाणलोटांसाठी वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्व्हेक्षण विकास यंत्रणा, पुणे यांची प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. उपरोक्त पाणलोटाकरिता वितरीत निधी व खर्च याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पाणलोटाचे नाव | वितरीत निधी रु. लाखात | खर्च रु.लाखात |
|---|---|---|---|
| १ | भांडगाव १ | २८.८९ | २८.५२ |
| २ | भांडगाव २ | २८.८९ | २८.५२ |
| ३ | डाळीब | २८.८९ | २८.५० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | भरतगाव | २८.८९ | २८.८९ |
| ५ | खोर-१ | २८.८९ | २८.८० |
| ६ | खोर-२ | २८.८९ | २८.४७ |
| ७ | खोर-३ | २८.८९ | २८.८९ |

(३), (४) व (५) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे यांचे स्तरावर तक्रारीची चौकशी करणेस्तव समिती गठीत केली असून तक्रारीची चौकशी प्रगतीपथावर आहे.

-----------------

## तळेवाडी (ता.आटपाटी, जि.सांगली) येथील ओढयावरील बंधारा विनापरवाना तोडल्याबाबत

**(४९) * ९०२५७ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेवाडी (ता.आटपाडी, जि.सांगली) येथील ओढयावर सन २०१५ मध्ये रोजगार हमी योजनेच्या कुशल निधीतून रुपये २५ लाख खर्च करुन बांधण्यात आलेल्या बंधाऱ्यांमुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या विहिरीना पाणी साठवण होत असताना तळेवाडीच्या ग्रामसेवकांने वरिष्ठांची मंजुरी न घेता कटरच्या सहाय्याने दिनांक १४ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास पुर्णपणे तोडून टाकला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, सांगली तहसिलदार आटपाडी, उपविभागीय अधिकारी विटा, गटविकास अधिकारी, पं.स.आटपाडी यांच्याकडे दिनांक ४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली असतानाही संबंधित ग्रामसेवकांवर व ठेकेदारांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करुन ग्रामसेवक व ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०१४ मध्ये सिमेंट बंधारा बांधण्यात आला आहे. सदर बंधारा पूर्ण क्षमतेने भरल्याने काही शेतकऱ्यांच्या शेतामध्ये जास्त पाणीसाठा होऊन शेतीचे नुकसान होत होते त्यामुळे काही अज्ञात शेतकऱ्यांनी बंधाऱ्यांतील पाणीसाठा कमी करण्याकरीता बंधाऱ्यांच्या मध्यभागी १ ते १.५ फुट उंचीचा बंधारा फोडून पाणी सोडून दिले. सदर बंधारा ग्रामसेवकांने फोडला नाही.

(२) सुखदेव विष्णू म्हारगुडे (अध्यक्ष आटपाटी तालुका रा.स.प) रा तळेवाडी, ता.आटपाटी यांनी मौजे तळेवाडी येथे सिमेंट बंधारा फोडले प्रकरणी दि.१७.४.२०१७ पासून उपोषणास बसणार असलेचे लेखी निवेदनाव्दारे तक्रार केली होती. त्या अनुषंगाने ग्रामसेवक यांनी सदरचा फोडलेला बंधारा २ महिन्याचे आत दुरुस्त करुन घेत असलेबाबत लेखी पत्र दिल्यानंतर तक्रारदार यांनी उपोषण मागे घेतले आहे. तसेच १४ वा वित्त आयोगांतर्गत बंधारा दुरुस्तीचे अंदाजपत्रक संबधित ग्रामपंचायतीस मिळालेले असून बंधारा दुरुस्तीचे गेट बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) व (४) संबंधित बंधारा शेतकऱ्यांनी फोडला असल्याचे उप अभियंता (छोपाउवि) यांनी कळविले आहे. सदरचा बंधारा २ महिन्याचे आत दुरुस्त करुन घेत असल्याबाबत ग्रामसेवकाने कळविले आहे. तसेच सदर बंधाऱ्याचे बाधंकाम सन २०१४ मध्ये पूर्ण झाले असल्याने या प्रकरणी ग्रामेसवक व ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत

**(५०) * ८५६८३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) पंचायत समितीच्या नव्या इमारतीचे काम प्रलंबित असल्यामुळे अनेक ठिकाणी तडे गेलेल्या जुन्या पंचायत समितीच्या कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांना काम करावे लागत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समितीची जुनी इमारत जमिनदोस्त करून त्या जागेवर बांधा-वापरा-हस्तांतरण (बीओटी) करा या तत्त्वावर नवीन इमारतीचे बांधकाम सन २०१० पासून सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासकीय भवनाबरोबरच या ठिकाणी व्यापारी संकुलही उभारण्यात येणार आहे तसेच सदर प्रकल्प २ वर्षात पूर्ण करण्याचे प्रस्तावित असताना जवळपास ७ वर्षे होवूनसुद्धा प्रकल्प अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास दिरंगाई करणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) जिल्हा परिषद रायगड यांचेकडून सदर पंचायत समितीचे बांधकाम BOT तत्वावर करण्यात येत असून विकासकाबरोबर करण्यात आलेल्या करारानुसार विहित मुदतीत बांधकाम पुर्ण होऊ शकले नाही.

यास्तव, विकासकाला वेळोवेळी नोटीसा बजावल्या असून निविदेतील तरतुदीनुसार विकासकाने तातडीने कार्यवाही न केल्यास करार रद्द करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

तसेच, सद्य:स्थितीत असलेल्या पंचायत समितीचे कार्यालय नवीन इमारतीत स्थलांतर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत तातडीने करण्यात येईल.

-----------------

**असर्जन (जि.नांदेड) येथील विष्णुपूरी प्रकल्पाच्या दरवाजांची झालेली दुरवस्था**

**(५१) * ८७७६३ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) असर्जन (जि.नांदेड) येथील विष्णुपूरी प्रकल्पाच्या एकूण १८ दरवाजांपैकी १० दरवाजे गेल्या अनेक वर्षापासून झिजून गेले असल्याने दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी यांत्रिकी मंडळाचे अधिक्षक अभियंता यांनी जलसंपदा विभाग व गोदावरी खोरे महामंडळाकडे सातत्याने मागणी करुनही निधी मिळत नसल्याने दापोडी पुणे येथील मागविलेले नवीन १० दरवाजे देखील बसविण्यात अडथळा निर्माण होत असल्याने दरवाजे वापराविना पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दरवाजाची पाहणी केली आहे काय व पाहणीनुसार विष्णुपूरी प्रकल्पाचे दरवाजे तातडीने बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) १८ दरवाज्यांपैकी ६ दरवाजे सन २००८ ते २०१५ या कालावधीत बदलले असून उर्वरित १२ दरवाजे बदलण्याचे प्रस्तावित आहे.

(२) व (३) क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी सदर दरवाजांची पाहणी केली असून दरवाजे बदलण्याच्या कामाचा अंतर्भाव विष्णुपूरी प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये करण्याच्या अटीच्या अधीन राहून शासनाने मान्यता दिलेली आहे. तसेच विष्णुपूरी प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावाची कार्यवाही महामंडळस्तरावर सुरु आहे.

यांत्रिकी संघटनेने मागणी केल्याप्रमाणे आतापर्यंत रु.१२.५४ कोटी निधी वर्ग केला असून सुधारित प्रशासकीय मान्यतेनंतर उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर जिल्हयात पानंद रस्ता बांधण्यास येत असलेल्या अडचणीबाबत**

**(५२) * ८५०१० श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील अनेक रस्त्यांचा कृती आराखडयात समावेश असतानाही पानंद रस्ता कामाकरीता असलेल्या रस्त्यांची रूंदी ८.५० मिटर असावी या अटीमुळे रस्ते बांधण्यास अडचणी येत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतीसाठी सदन असलेल्या कोल्हापूर जिल्हयात रस्त्यांसाठी १२ ते १५ फूटच जागा प्राप्त होत असल्याने शासनाकडे अनेकदा रस्त्यांची रुंदी ८.५० मिटर असण्याबाबतची अट शिथिल करण्याबाबतची मागणी करण्यात आलेली असतानाही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिलहयातील रस्त्यांची रूंदी ८.५० मिटर असण्याबाबतची अट शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत पाणंद रस्ता कामाकरीता शासन पत्र दि. २१.९.२०१० मध्ये असलेली ८.५० मीटरची अट शिथील करणेबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांनी शासनाशी पत्रव्यवहार केला आहे.

तथापि, शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो २०१०/ प्र.क्र. २७/ रोहयो- १० अ, दि. ४.३.२०११ नुसार शेत रस्ते किंवा पांधण रस्ते या रस्त्यांची रुंदी स्थानिक परिस्थिती लक्षात घेवून ती कमी करण्याची मुभा अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेला देण्यात आली आहे.

(३) उपरोक्त शासन परिपत्रकाच्या प्रती सर्व जिल्हाधिकारी यांना यापूर्वीच निर्गमित केलेल्या आहेत. तथापि, यासंदर्भात जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना पुन:श्च कळविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोळेगाव (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) परिसरात जलयुक्त शिवार योजनेची कामे निकृष्ट दर्जाची करण्यात येत असल्याबाबत

**(५३) * ९१८५८ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील गोळेगाव परिसरातील जलयुक्त शिवार योजनेतंर्गत जुई नदीवर बांधण्यात येत असलेल्या सिमेंट बंधाऱ्याची तसेच नदी रुंदीकरण व खोलीकरणाची कामे निकृष्ट दर्जाची करण्यात येत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार या कामांची चौकशी करुन सदर कामे दर्जेदार करण्यासोबतच दोषी अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियान सन २०१६-१७ अंतर्गत जुई नदीवरील सिमेंट बंधारे व नाला खोलीकरण व रूंदीकरणाची कामे विनिर्दीष्टेप्रमाणे (Standard Specifications) व गुणवत्तापुर्वक पूर्ण करण्यात आलेली आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पणोरे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) लघु पाटबंधारे योजनेबाबत**

**(५४) * ९०१९८ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पणोरे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) लघु पाटबंधारे योजनेस महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या दिनांक २८ मार्च, २०१३ रोजीच्या आदेशान्वये रुपये १०६७.२० लक्ष रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून संबंधीत ठेकेदारास कामाचे कार्यादेश दिले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयामध्ये अत्यंत कमी प्रमाणात पाऊस पडल्याने पणोरे (ता.पन्हाळा) परिसरामध्ये पाणीटंचाई सदृश्य स्थिती निर्माण झाली असून शेती व पिण्याच्या पाण्याबाबत नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर लघु पाटबंधारे तलावाचे ४० ते ५० टक्के काम पूर्ण झाले असून बांधकामाचे रुपये २३४.५४ लक्ष व भुसंपादनासाठी रुपये ५१ लक्ष इतक्या रक्कमेची देयके प्रलंबीत आहेत, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदर पणोरे लघु पाटबंधारे तलावाचे उर्वरित काम पूर्ण करण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सन २०१५-१६ मध्ये कमी पाऊस झालेला होता.

(३) व (४) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर लघु पाटबंधारे तलावाचे ५०% काम पूर्ण झाले असून जुन २०१५ पर्यंत झालेल्या कामाचे रुपये २३४.५४ लक्ष किंमतीचे देयक अदा करण्यात आलेले आहे. तसेच भुसंपादनाकरीता (मोजणी फी) रुपये ५१,०००/- व व्दारे निर्मिती आणि उभारणी कामाचे यांत्रिकी विभागाकडील रुपये ३९.९८ लक्ष किंमतीचे देयक जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचेकडे प्राप्त झाले असुन

जानेवारी, २०१७ ते मे, २०१७ पर्यंत केलेल्या कामाचे रुपये २३८.५६ लक्ष किमतीचे देयक महामंडळास मंजुरीसाठी सादर केले जाणार आहे. तसेच शासन निर्णय दिनांक २३ जून, २०१७ नुसार महामंडळाकडे रुपये १११.५२ कोटी निधी वितरीत केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवापूर (ता. तिवसा, जि.अमरावती) येथील बोर नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करण्याबाबत**

**(५५) * ८८०७६ अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवापूर (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत बोर नदीच्या उगमस्थानापासून ते शेवटच्या ठिकाणापर्यंत खोलीकरण व रुंदीकरण करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंधारण मंत्री यांना प्रत्यक्ष भेटून पत्रान्वये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोर नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर पत्राच्या अनुषंगाने तपासणी व सर्वेक्षण करीता कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग, अमरावती यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपुर (जि.सोलापूर) तालुक्यातील निरा व उजव्या कालव्यामधून शेतकऱ्यांना पाणी न मिळाल्याबाबत

**(५६) * ९०८४८ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपुर (जि.सोलापूर) तालुक्यातील निरा व उजव्या कालव्याच्या शाखा क्रं. १ व २ वरील अनेक शेतक-यांना मासिक पास असूनही पाणी मिळाले नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे ऐन उन्हाळयात पाण्याअभावी डांळीब, द्राक्षे बागा व शेतपिके जळून शेतक-यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसान झालेल्या फळ व शेतपिकांचे त्वरीत पंचनामे करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत व शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध न करुन देणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हा परिषदेच्या विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम व जलयुक्त शिवार अभियानांतर्गत केलेल्या कामात झालेला गैरव्यवहार

**(५७) * ८६५९१ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत सिंचन विभागामार्फत विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम व जलयुक्त शिवार अभियानांतर्गत केलेल्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबतच्या मागणीचे दिनांक १५ मे, २०१७ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार विकास कामांमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या संबंधीतांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्या दिनांक १८/०५/२०१७ च्या आदेशान्वये सदर कामांची चौकशी करण्याकरीता कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचा चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

तसेच जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक १२/०५/२०१७ च्या आदेशान्वये सदर कामांची चौकशी करण्याकरीता कार्यकारी अभियंता, जिगाव उपसा सिंचन विभाग, खामगाव यांना आदेश दिले आहेत. प्राप्त चौकशी अहवालानुसार संबंधितांवर कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पश्चिम महाराष्ट्रातील टेंभू योजनेतुन पारे, पाडळी, धामणी या गावातील तलाव भरुन देण्याबाबत

**(५८) * ८६१९३ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्रातील टेंभू योजनेतुन माण-खटावसह १६ गावांना टेंभूचे पाणी देण्यासंदर्भात दिनांक ७ जून, २०१७ रोजी मा.जलसंपदामंत्री, प्रधान सचिव, कृष्णा खोरे महामंडळ व लोकप्रतिनिधींसमवेत मंत्रालयामध्ये घेतलेल्या बैठकीमध्ये टेंभूच्या योजनेतुन परिसरातील तलाव भरुन देण्याचा निर्णय घेतलेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने टेंभु योजनेच्या माध्यमातुन नेहमीच दुष्काळग्रस्त असलेल्या पारे, पाडळी येथील दोन तलाव व धामणी येथील तलाव भरुन देण्याची येथील नागरीकांनीही वारंवार मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार पारे, पाडळी, धामणी या गावातील तलाव टेंभु योजनेच्या माध्यमातुन भरुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

मा.मंत्री, महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम यांचे अध्यक्षतेखाली दि. ०७/०६/२०१७ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या बैठकीमध्ये मायणी व परिसरातील वंचित गावाना तसेच माण तालुक्यातील प्रस्तावित १६ गावांना महसुल यंत्रणेकडून आवश्यक प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर फक्त पिण्यासाठी व पशुधनासाठी टेंभू योजनेतून पाणी उपलब्ध करुन देणेबाबतची चर्चा झाली. याबाबत प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

(२) ग्रामपंचायत पारे यांनी गांव ओढयामध्ये पाणी सोडणेची दि.१४/१०/२०१६ रोजी क्षेत्रिय स्तरावर मागणी केली होती.

(३) मागणीचे अनुषंगाने माहे मार्च २०१७ मध्ये धामणी गांव ओढयामध्ये टेंभू योजनेचे पाणी सोडणेत आले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे ढाकमोली (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) ते गुळवणे या मार्गावरील पूलाची झालेली दुरवस्था

**(५९) * ८५३४५ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ढाकमोली (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) ते गुळवणे या ग्रामीण मार्गावरील ढाकमोली मराठी शाळेजवळील पूलाची (कॉजवे) अत्यंत दुरवस्था झाली असल्याने पावसाळ्याच्या दिवसात अतिवृष्टीमध्ये सदर पूल वाहून जावून दुर्घटना होवू शकते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुलाच्या पुनर्बांधणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर पुलाची पाहणी करण्यात आली आहे.

(३) आबिटगाव, ढाकमोळी, खांडोत्री रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ६८ या रस्त्यावर कि.मी. २/५०० मध्ये ढाकमोली गावातील बौध्दवाडी येथे प्रश्नांकित कॅाजवे आहे. कॅाजवेची लांबी १६.०० मीटर व रुंदी ६.०० मीटर आहे. कॅाजवे ८०० एम.एम.व्यासाचा ९ रांगेचा आहे.

सदरचा कॅाजवे हा नादुरुस्त झाला असून पावसाळ्यामध्ये नदीच्या पूराचे पाणी कॅाजवे वरुन जाते.

पावसाळ्यामध्ये ग्रामस्थांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी कॅाजवेच्या ठिकाणी नवीन पूल बांधणे आवश्यक असून नवीन पुल बांधण्याचा कार्यक्रम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राबविला जात असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागास जिल्हा परिषदेमार्फत कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राजूरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील शासकीय कामांमध्ये निकृष्ट दर्जाच्या सिंमेटचा वापर होत असल्याबाबत

**(६०) * ८६२२८ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजूरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील जलसंधारणाची कामे लघुपाटबंधारे, लघुसिंचन, कृषी विभाग, मध्यम पाटबंधारे विभाग, वन विभाग या विभागाकडून शेतशिवारात नाला खोलीकरण, बोडी नुतनीकरण, मजगी, शेततळे, सिंमेट बंधारे, कोल्हापूरी बंधारे यासारखी विविध कामे कंत्राटदाराच्या मार्फत मोठया प्रमाणात सुरू असून या कामांवर करोडो रूपये खर्च करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामांवर परराज्यातील रामको, सागर, शक्ती, महासिंमेट सारखी सिंमेट वापरण्यात येत असून या सिंमेटच्या बॅगांवर उत्पादनाचा दिनांक नसून फक्त १२ आठवडयापर्यंत वापरा आणि नॉट फॉर रिसेल असे नमूद केलेले असतांनाही अधिका-यांच्या संगनमताने सदरहू निकृष्ट दर्जाच्या सिमेंटचा वापर करुन बांधकाम करण्यात येत असल्याचे दिंनाक १६ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्ह्यातील पेंच व्याघ्र प्रकल्पात वाघांची शिकार होत असल्याबाबत**

**(६१) * ९२७५५ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील पेंच व्याघ्र प्रकल्पात अनेक वाघांची शिकार होत असून यामध्ये पेंचमधील तोतलाडोह जलाशयात मासेमारी करणाऱ्यांनीच वाघाची शिकार केली असल्याचे व वन विभागाने दोन आरोपींकडून वाघांची नखे, हाडे व अन्य अवयव जप्त केल्याचे दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चार वर्षापुर्वी मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील शिकार प्रकरण उघडकीस आल्यांनतर चौकशी दरम्यान पेंच व्याघ्र प्रकल्पातही अनेक वाघांची शिकार झाल्याचे सिध्द झाले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्या पाच महिन्यापासून अनेक वाघ बेपत्ता झाले असून या वाघांची देखील शिकार झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) पेंच व्याघ्र प्रकल्पात अनेक वाघांची शिकार निदर्शनास आली नाही. पेंच व्याघ्र प्रकल्पात पकडण्यात आलेल्या दोन संशयीत आरोपींकडून वनगुन्हा क्र. ६७/१, दि.२६.०६.२०१७ अन्वये वाघांची हाडे व नखे जप्त करण्यात आलेली आहे. त्यामध्ये एक वाघ पेंच व्याघ्र प्रकल्पात कक्ष क्र. ५२४ मध्ये शिकार झाल्याचे निदर्शनास आले व एक वाघ सुमारे ०२ वर्षापुर्वी कक्ष क्र. २७१/२ संरक्षित वन, देवेलापार परिक्षेत्र प्रादेशिक मध्ये विद्युत प्रवाहाव्दारे शिकार झाल्याचे निदर्शनास आले.

(२) हे खरे नाही.

(३) गेल्या ०५ महिन्यापासून अनेक वाघ बेपत्ता झाले ही बाब निदर्शनास आलेली नाही. परंतु पेंच व्याघ्र प्रकल्पामध्ये वनगुन्हा क्र. ६७/१, दिनांक २६.०६.२०१७ मध्ये श्री.बाबुलाल कुमरे व श्री.देविदास कुमरे, रा.उसरीपार,

ता.रामटेक, जि.नागपूर या दोन संशयीत व्यक्तींना ताब्यात घेऊन त्यांचेकडुन वाघाची हाडे व नखे जप्त करुन वरीलप्रमाणे वनगुन्हा नोंदविण्यात आला.
(४) वनगुन्हा ६७/१, दिनांक २६.०६.२०१७ अन्वये वनगुन्हा नोंदवुन चौकशी करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्हयातील आरोग्य केंद्रे व उपकेंद्रामध्ये औषधे उपलब्ध नसल्याबाबत**

**(६२) * ९२८२५ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील आरोग्य केंद्रे व उपकेंद्रामध्ये औषधे उपलब्ध नसल्याची बाब दिनांक २५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा आरोग्य अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी याकडे दुर्लक्ष करत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांना औषधे उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
माहे मे, २०१७ मध्ये पुणे जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये औषधी साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होता.
(२) हे खरे नाही.
जिल्हा आरोग्य अधिकारी वा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अशा आशयाची तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) राज्यातील आरोग्य संस्थांना राज्यस्तरावरुन औषधे पुरविण्यात येतात. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांकरीता मागणीनूसार औषधांचा पुरवठा जिल्हा परिषद मार्फत देखील करण्यात येतो.

माहे जून, २०१७ मध्ये जिल्हा स्तरावरुन काही औषधे खरेदी करण्यात आली असून सदर औषधांचा पुरवठा प्राथमिक आरोग्य केंद्रांना करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यात कुत्रे चावल्याच्या, साप व विंचूने दंश केल्याच्या घटनांमध्ये झालेली वाढ

**(६३) * ८५६८६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यात शहरी व ग्रामीण भागात कुत्रे चावल्याच्या, साप व विंचूने दंश केल्याच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या २-३ महिन्यात कुत्रे चावल्याच्या २०००, साप चावल्याच्या २४ व विंचू चावल्याच्या ४८ घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या घटनांबाबत आरोग्य विभागाकडे नोंद असून तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना होत नसल्याने आवश्यक असणाऱ्या लसीच्या कमतरतेमुळे रूग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन रूग्णांना तातडीने सेवा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

कुत्रे चावल्याच्या, सर्पदंश, विंचूदंश  झाल्याच्या घटनांमध्ये अल्पशी वाढ झाली आहे. मागील २-३ महिन्यात श्वानदंशाच्या ९२९, सर्पदंशाच्या ४३ व विंचूदंशाच्या ७७ रुग्णांवर आरोग्य संस्थांमध्ये औषधोपचार झाले आहेत.

(३) व (४) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये श्वानदंश, सर्पदंश व विंचूदंशाच्या लसी पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत.

श्वानदंश, सर्पदंश व इतर विषबाधित रुग्णांवर शासकीय/निमशासकीय आरोग्य संस्थांमध्ये मोफत औषधोपचार करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### कोकणासाठी स्वतंत्र पर्यटन विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत

**(६४) * ८५३९५ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणासाठी स्वतंत्र पर्यटन विकास मंडळ स्थापन करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ११ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील पर्यटनस्थळांच्या विकासासाठी ३०५५ कोटींचा आराखडा एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या माध्यमातून कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे मा. मुख्यमंत्री यांनी जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत एक वर्ष उलटूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्वतंत्र पर्यटन विकास मंडळ स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय. मा.मुख्यमंत्री महोदयांनी " कोकणाकरिता स्वतंत्र अशा प्रकारचे पर्यटन विकास महामंडळ राज्य शासन तयार करेल. केवळ याचा पॅराफर्नेलिया वाढू नये याकरिता सबसिडरी कंपनी तयार करु" अशी घोषणा केली आहे.
(२) व (३) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकूण रू.३०५५ कोटी रकमेच्या संबंधित कामांचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. तथापि, एशियन डेव्हलपमेंट बँकेमार्फत मंजूर करण्यात येणाऱ्या आर्थिक सहाय्याच्या बाबींमध्ये पर्यटन ही बाब अग्रक्रमाने नसल्याचे एशियन डेव्हलपमेंट बँकेने सुचविल्याने रत्नागिरी जिल्ह्यातील रू.९८.८७ कोटी रकमेच्या पर्यटन विषयक कामांचा प्रस्ताव निधी उपलब्धतेकरिता स्वदेश दर्शन योजनेअंतर्गत केंद्रीय पर्यटन मंत्रालयास सादर करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(४) व (५) प्रश्न भाग १ येथील महामंडळ स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र कोकण पर्यटन विकास महामंडळ या नावाने मान्यता घेण्यात आली. त्यानुसार महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची स्थापन करण्यात येणारी उपकंपनी " महाराष्ट्र कोकण पर्यटन विकास महामंडळ" या नावाने कंपनी निबंधकाकडे अनुज्ञाप्तीसाठी शासन निर्णय, वित्त विभाग क्र.शासाऊ-१०.१२/प्र.क्र.२८/सा.ऊ., दि.८/१/२०१४ मधील मार्गदर्शक तत्वांनुसार अर्ज करण्यास शासनाने मान्यता दिली असून कंपनी निबंधकाकडे अर्ज करण्याबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. प्रकल्प निष्कासन समितीस सादरीकरण करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. याप्रमाणे कार्यवाही झालेली आहे.

-----------------

**पुणे जिल्ह्यातील गावांच्या गावठाणांचा विस्तार करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(६५) * ९२८२८ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील गावांचे गावठाण अनेक वर्षापासून वाढवले गेले नसल्याने व तेथील लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढली असल्याने तसेच गावठाणाबाहेर अनेक घरे बांधली गेली असल्याने सदर घरांचे बांधकाम अधिकृत करावे व गावठाणांचा विस्तार करावा असा प्रस्ताव पुणे जिल्हा परिषदेने दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास पाठवला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जासई (ता.उरण, जि.रायगड) ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील राजंणपाडा येथे ग्रामपंचायत निधीचा गैरवापर केल्याबाबत**

**(६६) * ९२८३८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जासई (ता.उरण, जि.रायगड) ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील राजंणपाडा येथील ग्रामपंचायत निधीतून केलेल्या रस्ता कॉंक्रीटीकरणाच्या कामात शासनाच्या निधीचा गैरवापर केल्याबाबतच्या अहवालात फेरबदल केल्याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती उरण यांच्यावर तातडीने कारवाई करण्याची

मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता जेएनपीटीच्या हद्दीत येत असून जेएनपीटी प्रशासनाकडून कोणतीही परवानगी न घेता रस्ता काँक्रीटीकरणासाठी ग्रामपंचायतीने काम मंजूर करून ग्रामपंचायत निधीचा गैरवापर केला असून रस्त्याचे काँक्रीटीकरण करून ठेकेदारास कामाच्या मुल्यांकनांसह देयक देवून कामात अनियमितता झाली असल्याचा अहवाल गटविकास अधिकारी, पंचायत समिती उरण यांनी तहसिलदार उरण यांना दिनांक २० ऑक्टोबर, २०१४ व २० डिसेंबर, २०१४ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), रायगड जिल्हा परिषद यांना पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या व अहवालामध्ये फेरबदल करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मार्च, २०१७ मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे.

(२) व (३) ग्रामपंचायत, जासई कडे प्राप्त होणाऱ्या ग्रामस्थांच्या मागणीस अनुसरुन ग्रामपंचायतीने रस्ता काँक्रिटीकरण करण्यास परवानगी मिळणेबाबत दि.१६/७/२०१३ रोजी जेएनपीटी प्रशासनाकडे अर्ज दिला आहे.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती उरण यांनी स्थळ पाहणी तसेच पंचायत समितीस्तरावर उपलब्ध अभिलेखाच्या आधारे रस्त्याचे काँक्रीटीकरण करुन ठेकेदारास कामाच्या मुल्यांकनासह देयक अदा करुन कामात अनियमितता केली असल्याचा अहवाल दि.२०/१०/२०१४ रोजी तहसिलदार, उरण व दि.२०/१२/२०१४ रोजी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा.पं.) रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांना सादर केला.

तथापि, यासंबंधात विविधस्तरावर प्राप्त होणाऱ्या तक्रारीस अनुसरुन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उरण यांनी ग्रामपंचायत स्तरावरील अभिलेखांची सविस्तर पडताळणी व संबंधितांना सुनावणी देऊन दि.३०.७.२०१५ रोजी फेर अहवाल सादर केला आहे. त्यानुसार ग्रामपंचायत निधीचा गैरवापर झालेला नाही. मात्र त्यामध्ये निदर्शनास आलेल्या अनियमिततांकरीता जबाबदार असलेल्या तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांच्याविरुध्द दि.१७.६.२०१७ अन्वये खाते चौकशीचे ज्ञापन बजावण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.